दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२८४ | बुधवार दि.११ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ग्रामीण राजकारणाचा नवा अध्याय

महाराष्ट्राच्या ग्रामीण राजकारणात सोमवारी लागलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या निकालांनी एक स्पष्ट संदेश दिला आहे. भाजप आता शहरीच नव्हे, तर ग्रामीण राजकारणातही निर्णायक ताकद बनला आहे. महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतीनंतर आता ‘मिनी विधानसभा’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांवर भाजपने मिळवलेले वर्चस्व ही केवळ निवडणूक यशाची नोंद नाही,

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी ‘टास्क फोर्स’

## कृषी विभागाचा मोठा निर्णय; असे करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

**पुणे । प्रतिनिधी**



राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी टास्क फोर्सची निर्मिती करण्याचा निर्णय कृषी विभागाने घेतला आहे. या कृती दलाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्याबरोबरच सामाजिक, आर्थिक आणि हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तींवर सर्वसमावेशक उपाययोजना राबवण्याचा निर्णय कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी परीपत्रकाद्वारे जाहीर केला. अशा प्रकारचे ‘टास्क फोर्स’ निर्माण करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले आहे.


राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी सातत्याने विविध योजना, उपक्रम व कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. मात्र, सध्या हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्ती, पिकांचे ▶▶ पान २ वर

**“ या कामांचा आणि पद्धतींचा असणार समावेश**

शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा अभ्यास आणि संशोधन. हवामान बदलामुळे शेतीवर होणाऱ्या परिणामांचा आढावा घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे. शेतकरी आत्महत्या प्रतिबंधासाठी धोरणात्मक उपयोजना. शेतीचे तंत्रज्ञान, आर्थिक साहाय्य, सामाजिक आधार आणि मानसिक आरोग्यावर आधारित एकात्मिक पद्धती विकसित करणे. आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीच्या काळातील तातडीच्या उपाययोजना आणि आपत्तीनंतरच्या पुनर्वसनासाठी विशेष कृती कार्यक्रमाची निर्मिती. विभागीय आणि जिल्हास्तरावरील अंमलबजावणीसाठी कृती आराखडा तयार करणे. विविध शासकीय, निमशासकीय आणि स्वयंसेवी संस्थांशी समन्वय साधणे.

# हा घातपात असू शकतो

## अजितदादांच्या अपघातावर रोहित पवारांना शंका



**मुंबई । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमानाचा अपघात झाला की हा घातपात होता? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यावर आता आमदार रोहित पवार यांनीही, या घटनेबाबत अनेक प्रश्न उपस्थित करत घातपाताची शंका व्यक्त केली आहे. मलाही शंका आहे, हा घातपात असू शकतो?. ही घटना हलक्यात घेऊ नका. माझा काका गेलाय, आम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. विमानाची तपासणी, अपघाताबद्दल प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे, सुरक्षेचा गंभीर प्रश्न आणि तांत्रिक गोष्टीबाबत गोळा केलेल्या माहितीचे त्यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत सादरीकरण केले.

### पायलटला अपघात घडवायचाच होता का?

स्थानिक लोकांनी सांगितले की दररोज येथे विमाने उतरतात त्यांचा आवाज वेगळा असतो. पण दादांच्या विमानाचा आवाज वेगळाच आला. तर रोहित पवार म्हणाले की ब्लॅक बॉक्समध्ये पायलटचा संपूर्ण आवाज रेकॉर्ड होता. तो शिंकला तरी त्याचा आवाज रेकॉर्ड होतो पण या पीपीटी मध्ये पायलटचा कोणताही आवाज येत नाही. हे कसे शक्य आहे. तुमचा ॲक्सीडंट होत असल्याचे दिसत असेल तर तुम्ही किंचाळणार, ओरडणार, दादांचे विमान पडत होते त्यावेळी को पायलट शांभवी पाठक म्हणाल्या ओ शिट ओ शिट, पण या पूर्ण घटनाक्रमात मुख्य पायलट एकही शब्द कसा बोलला नाही ? पायलट झोपला होता का, दुसरे काय करत होता, की त्याच्या मनात एकच निश्चय होता या विमानाचा ॲक्सिडेंटच घडवायचा होता? यामुळेच तो अजिबात बोलला नाही का असा प्रश्न तयार होत आहे.

यावेळी रोहित पवार यांनी वेगवेगळे दावे केले. ज्या कंपनीचे हे विमान होते, त्या व्हीएसआर कंपनीची चौकशी केली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. या अपघाताच्या घटनेच्या आदल्या दिवशी म्हणजे २७ जानेवारी रोजीच्या वेळापत्रकानुसार दादा संध्याकाळी मुंबईहून गाडीने पुण्याला येणार होते. ताफादेखील लागला होता, पण दादा का निघाले नाहीत? दादा एका मोठ्या नेत्याला भेटणार होते, त्या नेत्याला यायला का उशीर झाला? ▶▶ पान २ वर

# सिंचन प्रकल्पासाठी १५ हजार कोटी !



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील ५७ अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी, तसेच कालवे आणि वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी पंधरा हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे राज्यात आठ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. याचा लाभ राज्यातील सर्वच विभागांना होणार आहे. याबरोबरच पुरंदर विमानतळ भूसंपादनासाठी सहा हजार कोटी कोटींच्या कर्जालाही मान्यता देण्यात आली आहे.

राज्यात बांधकाम सुरू असलेले जलसिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी १५ हजार कोटी रुपयांचे कर्ज वित्तीय संस्थाकडून घेण्याचा निर्णय ७ ऑगस्ट २०१९ रोजीच्या मंत्रिमंडळ ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### पंतप्रधानांकडून पवारांच्या प्रकृतीची विचारणा

पुणे : राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांना प्रकृती बिघडल्याने तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांच्या मते, त्यांची प्रकृती आता स्थिर असून त्यात सकारात्मक सुधारणा होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही फोन करून त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. शरद पवारांना ११ फेब्रुवारी रोजी डिस्चार्ज मिळण्याची शक्यता आहे. ९ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादीचे नेते, खासदार शरद पवार यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. बारामतीतून पुण्यातील रुबी रुग्णालयात आणून त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले. बारामतीमध्ये असताना सकाळी डॉक्टरांची एक टीम शरद पवार यांची तपासणी करण्यासाठी गेली होती.

### बांगलादेशात आणखी एका हिंदू व्यापाऱ्याची हत्या

ढाका: बांगलादेशात सार्वत्रिक निवडणूक मतदानाला अवघे काही तास उरले असतानाच हिंसाचाराची एक धक्कादायक घटना समोर आली आहे. मयमनसिंह जिल्ह्यात एका ६२ वर्षीय हिंदू व्यापाऱ्याची त्यांच्याच दुकानात शिरून चाकूने भोसकून निर्घृण हत्या करण्यात आली. सुसेन चंद्र सरकार असे मृताचे नाव असून, ते तांदळाचे व्यापारी होते. बांग्लादेशात पंतप्रधानपदासाठी होणाऱ्या मतदानापूर्वी ही घटना घडल्याने अल्पसंख्याक समुदायाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सोमवारी रात्री ११ च्या सुमारास अज्ञात हल्लेखोरांनी दुकानात शिरून सुसेन यांच्यावर धारदार शस्त्राने वार केले. हत्या केल्यानंतर आरोपींनी दुकानाचे शटर ओढून तिथून पळ काढला. रात्री सुसेन घरी न परतल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेतला असता, दुकानात ते रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळले.

### चंद्रपूरात भाजपाला शिवसेना उबाठाचा पाठिंबा


चंद्रपूर: चंद्रपूर महापालिकेत काँग्रेस पक्षातच सत्तेपूर्वीच दोन गटात संघर्ष सुरु झाला. त्यामुळे भाजपाने या संधीचा फायदा घेत थेट शिवसेना उबाठाशी आणि शिवसेना उबाठानेही अगदी शेवटच्या क्षणी भाजपाशी युती केली. त्यामुळे चंद्रपूर महापालिकेच्या महापौर पदी भाजपाच्या विजयाचा मार्ग सुकर झाला. तसेच चंद्रपूरचे महापौर पद सव्वा सव्वा वर्षे विभागून घेण्याचा लेखी करार करण्यात आला. त्यामुळे चंद्रपूरच्या महापौर पदी भाजपाच्या संगीता खांडेकर अवघ्या एका मताने तर उपमहापौर पदी शिवसेना उबाठाचे प्रशांत दानव चिठ्ठीने विजयी झाले.

### ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प

मुंबई : राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय २३ फेब्रुवारीला सुरू होणार असून २० दिवसांच्या या अधिवेशनात ६ मार्च रोजी राज्याचा सन २०२६–२७ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला २३ फेब्रुवारी पासून मुंबईत सुरुवात होत आहे. या पार्श्वभूमीवर आज विधानभवनात संसदीय कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीत विधानसभा आणि विधानपरिषदेचे कामकाज निश्चित करण्यात आले. ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थ खाते स्वत:कडे ठेवले आहे. त्यामुळे तेच यंदाचा अर्थसंकल्प सादर करतील असे दिसते.

# बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**



लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरुद्ध विरोधकांनी अविश्वास प्रस्ताव आणला आहे, त्यांच्या विरोधात ११८ खासदार एकत्र आले आहेत. मंगळवारी काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांच्या नेतृत्वाखाली या प्रस्तावाची सूचना सचिवालयात सादर करण्यात आली. लोकसभेतील काँग्रेसचे उपनेते गौरव गोगोई, काँग्रेसचे मुख्य प्रतोद कोडिकुनिल सुरेश आणि खासदार मोहम्मद जावेद आणि इतरांनी ही सूचना लोकसभा सचिवालयात सादर केली. नोटीस सादर केल्यानंतर, लोकसभा अध्यक्षांनी सचिवालयाला अविश्वास प्रस्तावाची तपासणी करण्यास आणि प्रक्रिया जलद करण्यास सांगितले आहे.

काँग्रेस, समाजवादी पक्ष, द्रमुक आणि इतर अनेक विरोधी पक्षांच्या ११८ खासदारांच्या स्वाक्षरी असलेली ही सूचना संविधानाच्या कलम ९४ (क) अंतर्गत लोकसभा सचिवालयात ▶▶ पान २ वर

# दादांची जागा कोणीच घेऊ शकत नाही !

## उपमुख्यमंत्री पदभार स्वीकारताना सुनेत्रा पवार भावूक

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मंगळवारी (१० फेब्रुवारी) मंत्रालयात पदभार स्वीकारला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ, पार्थ पवार आणि अन्य नेते उपस्थित होते. दिवंगत अजित पवार यांच्या खुर्चीत सुनेत्रा पवार यांना बसताना पाहून त्यांचा पुत्र पार्थ पवारांना डोळ्यात अश्रू आवरले नाहीत. हा खूप भावूक क्षण होता. दादांची जागा कोणीच घेऊ शकत नाही असे सुनेत्रा पवारांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारत असताना विश्वासाची, कर्तव्याची आणि त्यागाची जाणीव सुद्धा आहे. मा. अजितदादांनी आयुष्यभर महाराष्ट्राच्या जनतेसाठी झटत विकासाचा जो ध्यास घेतला, तोच माझ्यासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. दादांची कार्यशैली, निर्णयक्षमता आणि लोकांशी असलेले आत्मीय नाते, हेच बळ घेऊन मी पुढील वाटचाल करणार आहे. त्यांच्या अपूर्ण स्वप्नांना पूर्णत्व देणे, शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देणे, हीच माझी प्राथमिकता असेल. असे सुनेत्रा पवारांनी पुढे म्हटले. दादांची जागा कोणीच घेऊ शकत नाही; पण त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि अधिक सक्षम महाराष्ट्र घडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न ▶▶ पान २ वर

# महा पशुधन एक्स्पो, माझी वसुंधरा लोगोचे मुख्यमंत्र्यांच्याहस्ते अनावरण




**मुंबई । प्रतिनिधी**

पशुसंवर्धन विभागाच्या वतीने बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे येत्या १३ ते १५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राष्ट्रीयस्तरावरील महापशुधन एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या बोधचिन्हाचे तसेच पर्यावरण विभागाच्या माझी वसुंधरा अभियानाच्या लोगोचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत झाले.

मंत्रालयात मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर झालेल्या कार्यक्रमास मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पशुसंवर्धन ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१० फेब्रुवारी २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: १५.५० क्विंटल | २,२५५ | २,७७० | २,५२९ |
| ज्वारी/हायब्रिड: ४५.०० क्विंटल | १,६०० | ३,९७० | ३,०३८ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १२.५० क्विंटल | ६,८०२ | ७,८०० | ७,५१३ |
| उडीद : ७.०० क्विंटल | ४,८०० | ५,७०० | ५,२५० |
| बाजरी: २६.५० क्विंटल | २,६५० | ३,२०० | २,९८७ |
| मुग: २.०० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| सोयाबीन: ५४.०० क्विंटल | ५,३७० | ५,३८० | ५,३७३ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,२०१ | ४,२०१ | ४,२०१ |

# पॅन कार्डची नवी नियमावली लवकरच लागू होणार

## गाडी खरेदी करण्यापासून ते कॅश डिपॉझिटपर्यंत सर्व बदलणार

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**पॅन कार्डशी संबंधित अनेक नियमांमध्ये बदल होणार आहेत. केंद्र सरकारने नुकताच नवीन आयकर नियम–२०२६ चा मसुदा (ड्राफ्ट) जारी केला आहे. या मसुद्यानुसार, आता कोणत्याही व्यक्तीच्या एक किंवा एकापेक्षा जास्त बँक खात्यांमध्ये एका आर्थिक वर्षात एकूण १० लाख रुपये किंवा त्याहून अधिक रोख रक्कम जमा केल्यास किंवा काढल्यास पॅन कार्ड अनिवार्य असेल.**




सध्याच्या नियमानुसार, एका दिवसात ५०,००० रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम जमा करताना पॅन कार्ड देणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे, मोटार वाहन खरेदी करताना पॅन क्रमांक देण्याच्या मर्यादितही बदल करण्यात आला आहे. पूर्वी मोटारसायकलसह कोणतीही मोटार वाहन खरेदी करताना त्यांची किंमत ५ लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास पॅन क्रमांक देणे अनिवार्य होते. सध्याच्या नियमांनुसार, दुचाकी खरेदीसाठी पॅन क्रमांकाची कोणतीही तरतूद नाही, परंतु इतर मोटार वाहनांसाठी किंमत कितीही असली तरी पॅन क्रमांक देणे अनिवार्य आहे.हॉस्पिटॅलिटी आणि इव्हेंट मॅनेजमेंट क्षेत्रावरही या नवीन नियमांचा परिणाम होणार आहे. हॉटेल किंवा रेस्टॉरंटचे बिल, कन्व्हेन्शन सेंटर, बँक्वेट हॉल किंवा कोणत्याही इव्हेंट मॅनेजमेंट सेवेसाठीचे पेमेंट १ लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास पॅन कार्ड देणे आवश्यक असेल. सध्या ही मर्यादा ५०,००० रुपये इतकी आहे. दुसरीकडे, कोणत्याही मालमत्तेची खरेदी, विक्री, गिफ्ट किंवा जॉइंट डेव्हलपमेंट ॲग्रीमेंटसाठी सध्या १० लाख रुपयांची मर्यादा आहे, ती वाढवून २० लाख रुपये करण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय, विमा कंपन्यांसोबत खाते–आधारित संबंध सुरू करण्यासाठी आता पॅन कार्ड अनिवार्य असेल. सध्या केवळ ५०,००० रुपयांपेक्षा जास्त वार्षिक प्रीमियम भरल्यावरच पॅन कार्डची गरज असते.

### १ एप्रिल २०२६ पासून अंमलबजावणी ?

नवीन आयकर कायदा १ एप्रिल २०२६ पासून लागू होणार आहे. पीटीआयच्या एका रिपोर्टनुसार आणि वित्त मंत्रालयातील सूत्रांच्या हवाल्याने सांगण्यात आले आहे की, सीबीडीटी संबंधितांशी चर्चा केल्यानंतर या नियमांना अंतिम रूप देईल आणि मार्चच्या पहिल्या आठवड्यापर्यंत यासंदर्भात अधिसूचना जारी केली जाईल.

# मंत्रिमंडळ बैठकीत अजित दादांनी घेतलेले ३ निर्णय मंजूर

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची मंगळवारी बैठक संपन्न झाली. बैठकीला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादांची अनुपस्थिती सर्वांना भावनिक करुन गेली, तर सुनेत्रा पवार यांनी पहिल्यांदाच मंत्रिमंडळ बैठकीला हजेरी लावली. या बैठकीत एकूण १९ निर्णय घेण्यात आले. त्यापैकी, ३ निर्णय हे अजित पवार यांच्या अखत्यारित प्रस्तावित आणि त्यांच्यासाठी महत्त्वाचे होते. त्यामुळे, या निर्णयाला प्राधान्याने मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

मंत्रिमंडळ बैठकीत सुरुवातीला अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. राज्याचे मुख्य सचिव यांनी शोकप्रस्ताव वाचला, त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची औपचारीक ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# ग्रामीण राजकारणाचा नवा अध्याय

महाराष्ट्राच्या ग्रामीण राजकारणात सोमवारी लागलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या निकालांनी एक स्पष्ट संदेश दिला आहे. भाजप आता शहरीच नव्हे, तर ग्रामीण राजकारणातही निर्णायक ताकद बनला आहे. महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतीनंतर आता 'मिनी विधानसभा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांवर भाजपने मिळवलेले वर्चस्व ही केवळ निवडणूक यशाची नोंद नाही, तर राज्यातील सत्तासमीकरणे बदलत असल्याचा ठोस संकेत आहे.

१२ जिल्हा परिषदांपैकी ८ आणि १२५ पंचायत समित्यांपैकी ४८ वर आघाडी घेत भाजपने हे सिद्ध केले की, कोणाच्याही आधाराशिवाय राज्यभर निवडणुका लढण्याची आणि जिंकण्याची क्षमता आता पक्षात निर्माण झाली आहे. महायुतीतील शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटालाही यश मिळाले असले, तरी केंद्रस्थानी भाजपच राहिला, हे नाकारता येत नाही. तरीही हा विजय एकसंध नाही. लातूरमध्ये काँग्रेसने आणि सांगलीत शरद पवार गटाने दाखवलेले वर्चस्व हे स्पष्ट करते की, महाविकास आघाडी पूर्णपणे संपुष्टात आलेली नाही. विशेषतः लातूरमध्ये भाजप नेत्यांनी केलेल्या 'विलासराव देशमुखांची ओळख पुसून काढण्याच्या' वक्तव्याला मतदारांनी दिलेले उत्तर हे राजकीय अहंकाराला मिळालेले प्रत्युत्तर म्हणावे लागेल. या निकालांनी आणखी एक बाब अधोरेखित केली. महायुतीतील अंतर्गत स्पर्धा, अनेक ठिकाणी भाजपला थेट आव्हान देणारा पक्ष म्हणजे शिवसेना शिंदे गट ठरला. कोकणात, विशेषतः सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगडमध्ये ही लढत उघडपणे दिसली. सिंधुदुर्गात भाजपची एकहाती सत्ता, रत्नागिरीत शिंदे गटाचा दबदबा आणि रायगडमध्ये राष्ट्रवादी शिवसेना संघर्ष, यावरून भविष्यातील संघर्षरेषा स्पष्ट होत आहेत. पश्चिम महाराष्ट्रात अजित पवार गटाला मिळणारी सहानुभूती, पुण्यातील वर्चस्व आणि कोल्हापुरातील आघाडी हे दर्शवते की 'दादांचा बालेकिल्ला' अजूनही पूर्णपणे ढासळलेला नाही. मात्र सोलापूर, सातारा येथे भाजपची सरशी ग्रामीण पट्ट्यातील बदलती मानसिकता अधोरेखित करते.

या साऱ्या चित्रात सर्वात मोठा विरोधाभास म्हणजे घराणेशाही. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांत ज्यावर टीका झाली, तीच घराणेशाही जिल्हा परिषद निवडणुकांत अधिक ठळकपणे समोर आली. नेत्यांची मुले, पत्नी, भाऊ, पुतणे यांचा भरणा वाढलेला असताना पंचायत समित्यांमध्ये मात्र कार्यकर्त्यांना संधी मिळाल्याचे चित्र आहे. हे दुभंगलेले वास्तव राजकीय पक्षांच्या अंतर्गत लोकशाहीवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. निकालानंतर प्रत्येक विजयी उमेदवाराने 'विजय कार्यकर्त्यांना आणि जनतेला समर्पित' केल्याचे सांगितले. मात्र ज्या मतदारांनी एखाद्या पक्षाविरोधात मतदान केले, त्याच पक्षाला सत्तेसाठी पाठिंबा देताना त्या जनतेला विश्वासात घेतले जाणार का? हा प्रश्न अनुत्तरितच आहे. सत्ता स्थापन करण्याच्या गणितात मतदारांची भूमिका केवळ आकड्यांपुरती मर्यादित राहते की काय, हा लोकशाहीचा मूलभूत प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

एकूणच, या निकालांनी भाजपचे ग्रामीण वर्चस्व अधोरेखित केले असले, तरी त्याचवेळी विरोधी पक्षांची अस्तित्वाची लढाई, महायुतीतील अंतर्गत संघर्ष आणि घराणेशाहीचा विळखा अधिक ठळक केला आहे. आगामी जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकांमध्ये हीच समीकरणे अधिक तीव्र होतील. निवडणुका होतात, निकाल लागतातकिमान बिनविरोध टेंडरच्या काळात लोकशाहीचा हा श्वास तरी शिल्लक आहे, हीच समाधानाची बाब म्हणावी लागेल.

# रोहिलागड जामखेड येथे परीक्षा केंद्रावर कारवाई

जालना । प्रतिनिधी

अंबड तालुक्यात 'कॉपीमुक्त' अभियानाचा एल्गार; महसूल व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त कारवाईत ६ कॉपीबहाद्दर विद्यार्थ्यांवर कारवाई. महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात येत असलेल्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेतील इंग्रजी विषयाच्या पेपरला आज अंबड तालुक्यात प्रशासनाने कॉपी बहाद्दरांवर जबरदस्त वचक निर्माण केला. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या आदेशान्वये राबविण्यात येत असलेल्या 'कॉपीमुक्त अभियाना' अंतर्गत आज महसूल आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने धडक कारवाई करत एकूण ६ विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

जामखेड व रोहिलागड येथे संयुक्त पथकाची धडक: आज इंग्रजी विषयाच्या पेपर दरम्यान मौजे जामखेड आणि मौजे रोहिलागड येथील परीक्षा केंद्रांवर प्रशासनाने अचानक धाड टाकली. या संयुक्त कारवाईत उपविभागीय अधिकारी श्री. उमाकांत पारधी, पोलीस निरीक्षक श्री. संतोष घोडके आणि परिक्षाधीन () अधिकारी यांचा समावेश होता. या उच्चस्तरीय संयुक्त पथकाने केलेल्या तपासणीत आणि अंगझडतीत रोहिलागड येथील केंद्रावर २ विद्यार्थी कॉपी करताना रंगेहाथ पकडले गेले. पोलीस आणि महसूल प्रशासनाच्या या संयुक्त कारवाईमुळे परीक्षा केंद्रावर खळबळ उडाली होती. अंकुशनगर व शहागड येथे तहसीलदार यांच्या पथकाची कारवाई: दुसऱ्या बाजूला, तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी श्री. विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने मौजे अंकुशनगर आणि मौजे शहागड येथील केंद्रांना भेटी दिल्या. अंकुशनगर: येथील श्री शिवाजी हायस्कूल (केंद्र क्र. ०५२१) मध्ये तपासणी दरम्यान २ विद्यार्थ्यांकडे कॉपीचे साहित्य आढळून आले. शहागड: येथील केंद्रावर देखील २ विद्यार्थी कॉपी करताना आढळले. अशा प्रकारे दिवसभरात जामखेड-रोहिलागड (संयुक्त कारवाई), अंकुशनगर आणि शहागड मिळून एकूण ६ विद्यार्थ्यांवर कॉपी केल्याप्रकरणी प्रशासनाकडून सक्त कारवाई करण्यात येत आहे. शिक्षण विभागाला याबाबत पुढील कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले आहेत. ''तालुक्यात कॉपीमुक्त अभियान केवळ कागदावर नसून प्रत्यक्षात कडकपणे राबवले जात आहे. आज पोलीस निरीक्षक आणि दर्जाच्या अधिकाऱ्यांनी स्वतः केंद्रावर हजेरी लावून संयुक्त कारवाई केली आहे. त्यामुळे विद्यार्थी किंवा पालकांनी कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करू नये. यापुढे असा प्रकार आढळल्यास संबंधित विद्यार्थी आणि त्यांना मदत करणाऱ्यांवर पोलिसांच्या मदतीने कडक फौजदारी कारवाई करण्यात येईल. असा इशारा जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे.

# जिल्हाप्रमुख ॲड.चंद्रकांत नवले यांनी केला विविध उपक्रमांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचा वाढदिवस साजरा

बीड । प्रतिनिधी

**राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त गेवराई तालुका शिवसेनेच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या शिवसेनेच्या विचारांची जाणीव करून देणारे हे उपक्रम तालुक्यात मोठ्या उत्साहात पार पडले. जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांनी गेवराई तालुक्यामध्ये गाईंना चारा वाटप रुग्णांना फळ वाटप यासह रक्तदान शिबिर घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस साजरा केला.**



गेवराई शहरातील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिवसैनिक व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकी जपली. त्यानंतर युवा सेनेच्या वतीने खळेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते धर्मराज आहेर यांच्या जानकी साहेब गोशाळा येथे गोमातांसाठी पेंड व चारा देण्यात आला. तसेच गेवराई उपजिल्हा रुग्णालय येथे उपचार घेत असलेल्या रुग्णांना फळवाटपाचा कार्यक्रम जिल्हा संघटक विक्रम राजे भोसले यांच्या पुढाकारातून राबविण्यात आला. याचबरोबर बीड जिल्हा कर्करोगमुक्ती अभियानांतर्गत उपजिल्हा रुग्णालयात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सर्व कार्यक्रमांच्या समारोपप्रसंगी बीड जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत आप्पा नवले यांनी उपस्थित शिवसैनिकांना ठाम शब्दांत मार्गदर्शन केले. ते म्हणाले, माननीय एकनाथजी शिंदे साहेब यांचे संपूर्ण जीवन गोरगरीब, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेसाठी समर्पित आहे. सुदैवाने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे नंतर उत्तुंग आणि उच्च असं नेतृत्व माननीय एकनाथ शिंदेच्या रूपाने आपल्याला तसेच सर्व सामान्यांसाठी आणि गोरगरिबांसाठी झटणारे नेतृत्व मिळालेले आहे. हे आपले भाग्य आहे. यावेळी सर्व पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी हे जास्तीत जास्त रक्तदान शिबिरात सहभागी होऊन रक्तदान केल्याबद्दल त्यांचे भरभरून कौतुक केले आणि आभार मानले. शिवसैनिकांनीही अन्यायग्रस्त, पीडित व गरजू घटकांसाठी रस्त्यावर उतरून काम केले पाहिजे. कुणावर अन्याय झाला तर मला अर्ध्या रात्रीही फोन करा, शिवसेना तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील. एकनाथजी शिंदे यांचे विचार आणि धनुष्यबाण हे चिन्ह संपूर्ण गेवराई मतदारसंघात घराघरात पोहोचवण्याची जबाबदारी शिवसैनिकांची आहे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून बीड जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत आप्पा नवले पाटील, गेवराई शहरप्रमुख मुकेश महाजन, विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, जिल्हा संघटक विक्रम राजे भोसले, युवा सेना तालुकाप्रमुख विभीषण मोघे, युवा सेना विधानसभा प्रमुख उमेश शिंदे, व्ही.जे.एन.टी. तालुकाप्रमुख बाळासाहेब खेडकर यांच्यासह गोसेवक धर्मराज आहेर, बाळासाहेब आहेर, कालिदास वनवे, गणेश पवार, शिवराज उगले, प्रकाश नरनाळे, श्री. नवनाथ भडके, शेख जावेद, अजिंक्य मुळे, विठ्ठल पवार, गणेश चव्हाण, तेजस साबळे, श्री. मोरे साहेब, माऊली मामा चव्हाण, अर्जुन चव्हाण, नितीन काळे, जिगे साहेब आदी पदाधिकारी, शिवसैनिक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परीक्षेत गैरप्रकार टाळण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे कडक कारवाईचे निर्देश

**जालना । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात सुरू असलेल्या इयत्ता १२ वीच्या परीक्षांमध्ये कुठल्याही प्रकारचा गैरप्रकार घडू नये, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी अत्यंत दक्षता बाळगावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. याबाबत जिल्ह्यातील सर्व ७९ परीक्षा केंद्रांचे केंद्र संचालक तसेच त्या ठिकाणी नेमण्यात आलेल्या बैठे पथकातील सदस्यांची ऑनलाईन बैठक घेण्यात आली.**



या बैठकीत जिल्हाधिकारी मित्तल यांनी परीक्षेची पारदर्शकता, शिस्त व शांत वातावरण अबाधित ठेवण्यावर भर दिला. प्रत्येक परीक्षा केंद्रातील प्रत्येक परीक्षा हॉलमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित ठेवणे बंधनकारक असून, त्याची नियमित तपासणी करण्याचे निर्देश त्यांनी दिले. सीसीटीव्ही बंद अथवा निष्क्रिय आढळल्यास तात्काळ दुरुस्ती करून परीक्षा सुरळीत पार पाडण्याची जबाबदारी केंद्र संचालकांची असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. बैठे पथकातील सदस्यांनी केवळ एका ठिकाणी बसून न राहता, नियुक्त केलेल्या परीक्षा केंद्रातील प्रत्येक परीक्षा हॉलमध्ये प्रत्यक्ष फिरून पाहणी करावी, तसेच कुठल्याही प्रकारचा गैरप्रकार, संशयास्पद हालचाल किंवा नियमभंग होत नाही याची सतत खात्री करावी, असे निर्देश देण्यात आले. तसेच, परीक्षार्थींना कोणताही ताण न येता सकारात्मक, सुरक्षित व शांत वातावरणात परीक्षा देता यावी, यासाठी सर्वांनी संवेदनशीलतेने काम करावे. विद्यार्थ्यांशी सौजन्यपूर्ण वागणूक ठेवत नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. बारावीची परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील अत्यंत महत्त्वाची परीक्षा असून, तिची विश्वासार्हता आणि प्रामाणिकता टिकवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. यासाठी प्रशासन, केंद्र संचालक व बैठे पथक सदस्यांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी केले.

# शहरात ऑलआऊट ऑपरेशन व कोबिंग मोहिम

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहरात वाढत्या गुन्हेगारीवर वचक बसविण्यासाठी व आस्थापना वेळीच बंद करण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल यांनी सुचना दिल्या होत्या.**

त्याअनुषंगाने दिनांक ०९/०२/२०२६ रोजी मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपणी यांचे नेतृत्वा खाली जालना शहरात ११.०० वाजे पासुन ऑलआऊट ऑपरेशन राबविण्यात आले आहे. सदर कारवाई दरम्यान जालना शहरातील अपरात्री सुरु असणारे आस्थापने बंद करुन आस्थापना धारक यांना त्यांच्या आस्थापणा वेळेत बंद करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहे. तसेच आर्म ॲक्ट प्रमाणे या पुर्वी दाखल असलेले रेकॉर्ड वरील ५२ आरोपी चेक करुन १२ आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच कोबिंग दरम्यान अवैध वाळू वाहतुक करणारे एका हायवा वाहनांवर कारवाई करुन २५,३०,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करत हायवा चालक व मालक याचे विरुध्द पोलीस ठाणे सदर बाजार जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बसंल, यांचे मार्गदर्शनाखाली मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधीकारी श्री. अनंद कुलकणी, श्रीमती जानवी शेखर परिविक्षाधिन पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक स्थागुशा , पोलीस निरीक्षक श्री. बाळासाहेब पवार पोस्टे चंदनझिरा, पोलीस निरीक्षक, पोस्टे सदर बाज़ार, पोलीस निरीक्षक , पोलीस ठाणे तालका जालना, पोलीस निरीक्षक , पोस्टे कदिम जालना व स्थानिक गुन्हे शाखा जालना, पोलीस ठाणे सदर बाजार, तालुका जालना, कदिम जालना, चंदनझिरा, आर.सी.पी चे असे एकुण १२६ पोलीस अमंलदार हजर होते.

# ग्रामीण भागात अधिकाधिक दर्जेदार आरोग्य सेवा द्या-आ.लोणीकर

**जालना । प्रतिनिधी**

**नव्याने सुरू करण्यात आलेल्या भगस हॉस्पिटलचे उद्घाटन आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. ग्रामीण व परिसरातील नागरिकांना दर्जेदार, आधुनिक आणि परवडणाऱ्या आरोग्य सेवा मिळाव्यात, हा उद्देश या रुग्णालयामागे असून या उपक्रमाचे आमदार लोणीकर यांनी विशेष कौतुक केले.**



उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार लोणीकर म्हणाले, ''ग्रामीण भागातील नागरिकांना आजही चांगल्या उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे जावे लागते. ही गरज ओळखून वाटूरसारख्या ठिकाणी आधुनिक सुविधा असलेले रुग्णालय सुरू होणे ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. भगस हॉस्पिटलने अधिकाधिक रुग्णांना उत्तम, तत्काळ व माफक दरात उपचार देऊन समाजसेवेचे आदर्श निर्माण करावेत,'' असे त्यांनी सांगितले. भगस हॉस्पिटलमध्ये आधुनिक तपासणी यंत्रणा, अद्ययावत उपचार पद्धती, आपत्कालीन सेवा, प्रयोगशाळा, प्रसूती विभाग तसेच सर्वसामान्य रुग्णांसाठी विशेष सोयी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. यामुळे परिसरातील नागरिकांना जालना, औरंगाबाद किंवा इतर मोठ्या शहरांत जाण्याची गरज कमी होणार आहे.

या वेळी रुग्णालयाचे संचालक व डॉक्टरांनी भगस हॉस्पिटलच्या उद्दिष्टांची माहिती देताना सांगितले की, ''रुग्णसेवा हीच खरी सेवा मानून आम्ही काम करणार आहोत. गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी विशेष सवलती, मोफत तपासणी शिबिरे आणि जनजागृती उपक्रम राबवले जाणार आहेत.'' कार्यक्रमाला स्थानिक पदाधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्यानंतर आमदार लोणीकर यांनी रुग्णालयाची पाहणी करून उपलब्ध सुविधांचे कौतुक केले. भगस हॉस्पिटलच्या माध्यमातून वाटूर व परिसरातील हजारो नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवेचा लाभ मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी व्यापारी शेतकरी बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

## शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी

नुकसान, आर्थिक अडचणी, सामाजिक ताणतणाव आणि मानसिक अस्थैर्याच्या समस्या निर्माण होतात. अशा विविध कारणांमुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यांना या अडचणींचा सामना करता यावा, नैराश्यातून बाहेर पडता यावे म्हणून योग्य मार्गदर्शन आणि मानसिक आधाराची आवश्यकता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठीच्या प्रयत्नांबरोबरच आपत्तीपूर्व, आपत्ती काळात आणि आपत्तीनंतर शेतकऱ्यांना शेती, आर्थिक, सामाजिक आणि मानसिक या चतुःसूत्री दृष्टिकोनातून एकात्मिक उपाययोजना राबविण्यासाठी या कृतिदलाची निर्मिती करण्यात येत असल्याचे विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. विस्तार आणि प्रशिक्षण विभागाचे संचालक रफिक नाईकवाडी यांच्या अध्यक्षतेखालील कृतिदलात सुनील बोरकर, उदय देशमुख, गणेश घोरपडे, जीवन बुंदे, नंदकिशोर नाईनवाड, सत्यजित शितोळे, सोनाली शिळकर या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तसेच 'शिवार फाउंडेशन'च्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर काम करणारे संशोधक, कृषी समाजशास्त्रज्ञ डॉ. विनायक हेगाणा आणि महिला शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर संशोधन करणाऱ्या मानसोपचार तज्ज्ञ सृष्टी डोईजड यांची विशेष सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

-----------

## सिंचन प्रकल्पासाठी

बैठकीत घेण्यात आला होता. त्यापैकी ७ हजार ५०० कोटी रुपयांचे प्रथम टप्प्यातील कर्ज नाबार्डकडून घेण्याचा निर्णय ११ मार्च २०२४ रोजीच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता. आता उर्वरित ७ हजार ५०० कोटी रुपयांचे कर्ज नाबार्डकडून घेण्यास आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली. राज्यातील ५७ अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे आणि १९३ पूर्ण प्रकल्पांच्या वितरण प्रणालीत सुधारणा करण्यासाठी पंधरा हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास आज एकत्रित सुधारित मान्यता देण्यात आली. सर्व जलसिंचन प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राज्यात सुमारे आठ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. पंधरा हजार कोटी पैकी ८ हजार ९८२ कोटी ७६ लाख रुपये ५७ अपूर्ण सिंचन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी तर ६ हजार १७ कोटी २४ लाख रुपये १९३ पूर्ण झालेल्या सिंचन प्रकल्पांच्या कालवे आणि वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठीच्या कामासाठी प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली.

-------------

## हा घातपात असू

उशीर झाल्याने दुसऱ्या दिवशी विमानाने जाण्याचे ठरले का? प्लॅन का बदलला? असे रोहित पवार यांनी म्हटले आहे. व्हीव्हीआयपी झेड सुरक्षा असणाऱ्या दादांना घेऊन हे विमान चालले होते. बारामतीतून हे विमान पाटणाला जाणार होते. कंपनीकडून पायलटवर दबाब होता, अशीही माहिती त्यांनी निदर्शनास आणून दिली. विमानात यांत्रिक बिघाड झाला होता का?, टेक-ऑफ पूर्वी विमानाची तपासणी करण्यात आली होती का?, तपासणी करणारे कर्मचारी कोण?, विमानाचा टेकलॉग कुठे आहे?, विमान उड्डाणास योग्य असल्याचा अहवाल कुठे आहे?, दृष्यमानता कमी असताना विमान का उतरवले?, त्या विमानात अतिरिक्त इंधन टाक्या होत्या का?, दादा बसले होते त्याच्या मागच्या बाजूला इंधन टाक्या होत्या का? अशा अनेक शंका रोहित पवार यांनी उपस्थित केल्या आहेत. घटना घडण्यापूर्वी विमान सूरतला जाऊन आले होते, असाही दावा त्यांनी केला. संबंधित विमान कंपनी मालकावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा. व्हीएसआर कंपनीवर अजून कारवाई का नाही? यावरही त्यांनी जोर दिला. पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले की, अजित पवार यांना घेऊन येणारे विमान हे ७ वाजून २० मिनिटाला तयार होते. त्यावेळी या विमानाचा एक पायलट ट्रॅफिकमध्ये अडकला होता. मात्र व्हीआरएस कंपनीने या विमानासाठी नियुक्त करण्यात आलेले दोन्ही पायलट अचानक बदलले. त्यामुळे एक पायलट ट्रॅफिकमध्ये अडकलेला असताना दोन्ही पायलट का बदलले असा सवाल यावेळी उपस्थित केला. पुढे रोहित पवार म्हणाले की, डिजीसीए आणि इतर एजन्सीच्या नियमानुसार विमानाचे कॉक पीट मधील व्हाईस रेकॉर्डिंग बंद होते असा दावा केला. तसेच विमानातील गोष्टी या पूर्ण क्षमतेच्या कार्यरत नव्हत्या असा आरोपही यावेळी करत पुढे म्हणाले की, बारामती विमानतळाच्या जवळ जेव्हा हे विमान आले त्या वेळी व्हीसीबीलीटी आहे का अशी विचारणा खाली विमानतळावर करण्यात आली. त्यावेळी विमानतळाने ३ किलोमीटर पर्यंत व्हीसीबीलीटी असल्याचे सांगितले. तसेच विमानातील अर्लट देणारी यंत्रणाही बंद होती. मूळ पायलट कपूरने विमान उतरविण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी विमानाचे एक बटन बंद केले. त्यामुळे सरळ रेषेत खाली येत असलेले विमान वाकडे होऊन खाली पडयला लागले तरी विमानात पायलटकडून कोणतेही भाष्य करण्यात आले नाही. परतु विमान कोसळण्याच्या काही सेंकद आधी कपूर यांच्यासोबत असलेली सह वैमानिक पाठक हिने शीट असा शब्द प्रयोग दोन-तीन वेळा केल्याचे एटीएसच्या रडारच्या रेकॉर्डींगमध्ये ऐकायला मिळते. त्यामुळे अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात पायलट कपूर, विमान बुकींग कंपनी ऐरो आणि दिल्लीच्या कंपनीने ऐनवेळी दोन्ही पायलट का बदलले असा संशय व्यक्त केला. या विमान अपघाताची चौकशी खर तर तंत्रज्ञ असलेल्या असलेल्यांकडून केली जायला पाहिजे होती पण याची चौकशी सीआयडीकडून करण्यात येत आहे, असे ते म्हणाले. सकाळी ८ वाजून ४३ ते ४५ मिनिटांनी ही घटना घडली. ९ वाजता दादा गंभीर जखमी आहेत. पण जिवंत आहेत, अशी बातमी मिळाली. ९.४५ वाजता दादांच्या निधनाची बातमी आली. डोकं सुन्न झाले. दादांचे ९ वाजता बंद झालेले घड्याळ सापडले. दादा घड्याळ नेहमी पंधरा मिनिटे पुढे ठेवायचे. ते आज आपल्यात नाहीत, पण विचाराने ते आपल्यासोबत आहेत, हे सांगत असताना रोहित पवार भावूक झाल्याचे दिसून आले.

**लँडिंगसाठी २९ नंबर धावपट्टी सोपी होती...**

बारामती विमानतळाचा ११ नंबर धावपट्टी टेबल टॉप म्हणजे उंच आहे त्या ठिकाणी विमान उतरवणे अवघड असते पण २९ नंबर वर धावपट्टीची बाजू सपाट आहे त्याठिकाणी लॅंडिंग सोपे असते पण तो निर्णय का घेतला नाही. तसेच वाऱ्याचा वेगपण कमी होता. तसेच २९ नंबर धावपट्टीची परवानगी घेतली होती. पण ऐनवेळी ११ धावपट्टीची मागणी करण्यात आली असे का, हे काम को पायलट करत नाही तर मुख्य पायलट घेत असतो. हे का करण्यात आले. असा प्रश्न पडतो. पायलट वादग्रस्त आहे तर महत्वाच्या व्यक्तिंची विमाने याला उडवण्यासाठी का दिले तसेच. व्ही के सिंग व्हीसीआर ग्रुपचा मालक आहे त्यांच्या एक व्हाटसअप ग्रुप आहे त्यामध्ये या सुमित कपूर बाबत अनेक खूलासे आहेत त्याच्या दारु पिण्यामुळे अनेक उड्डाणे रद्द झाली आहेत. हे व्हाटस मेसेज जनतेसाठी खूले करावेत असे पवार म्हणाले.

--------------------

## महा पशुधन एक्स्पो, माझी वसुंधरा

विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन यांच्यासह विविध मंत्री तसेच सचिव उपस्थित होते. पशुसंवर्धन विभाग व व पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या वतीने बीडमधील परळी वैजनाथ येथील ओपळे मैदानात हे महा पशुधन एक्स्पो होणार आहे. या प्रदर्शनात देशभरातील विविध जातीवंत पशुधन पाहण्यास मिळणार आहेत. त्याशिवाय पशुवैद्यकीय तज्ज्ञांचे मार्गदर्शन, विविधल पशुसंवर्धन विषयक योजनांचे सादरीकरण, पशुपालन विषयक प्रात्यक्षिके आदींसह सुमारे विविध विषयांवरील ३०० स्टॉल उभारण्यात येणार आहेत. याशिवाय विविध प्रकारचे ४५ हून अधिक स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या प्रदर्शनात सुमारे हजाराहून अधिक विविध पशुपालक आपल्या पशुंसह सहभागी होणार आहेत. तसेच पशुपालन विषयक क्षेत्रातील तज्ज्ञ, अभ्यासक व विद्यार्थीही या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत.

--------

## दादांची जागा कोणीच

मी नक्की करेन. या कठीण प्रसंगी जनतेने दिलेले प्रेम, आधार आणि विश्वास हेच माझे सामर्थ्य आहे. त्यांच्या स्मृतीपुढे आज मी एकच वचन देते की, महाराष्ट्राच्या हितासाठी निष्ठेने आणि समर्पणाने कार्य करत राहीन, अशी ग्वाही त्यांनी दिली. उपमुख्यमंत्र्यांच्या दालनात दाखल होताच त्यांनी पहिल्यांदा अजितदादांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन केले. त्यानंतर खुर्चीला आणि समोरील टेबलास हात जोडून नमस्कार केला. त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाचा पदभार स्वीकारण्यापूर्वी प्रभादेवी येथील श्री सिद्धीविनायक मंदिरात जाऊन गणरायाचे दर्शन घेतले. सिद्धीविनायकाचे मनोभावे दर्शन घेतले, पूजा केली. लोककल्याणाचे, विकासाचे कार्य निरंतर पुढे हाकण्यासाठी बळ दे, अशी प्रार्थना केल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच त्यांनी दादर येथे चैत्यभूमीवर जाऊन भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन केले.

-------------

## बिर्ला यांच्याविरुद्ध

सादर करण्यात आली आहे. २ फेब्रुवारी रोजी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरील चर्चेदरम्यान, राहुल गांधींना माजी लष्करप्रमुख एम.एम. नरवणे यांचे अप्रकाशित आत्मचरित्र, सभागृहाचा अवमान केल्याबद्दल आठ विरोधी खासदारांचे निलंबन आणि इतर मुद्द्यांवर चर्चा करण्याची परवानगी देण्यात आली नाही, यामुळे सभागृहात गोंधळ निर्माण झाला. विरोधी नेत्यांना लोकसभेत बोलू दिले जात नाही, तर सत्तेत असलेल्यांना बोलण्याची मोकळीक दिली जाते, असा विरोधकांचा आरोप आहे. दरम्यान, या प्रस्तावावर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सही केलेली नाही.

-----------

## मंत्रिमंडळ बैठकीत अजित

ओळख करुन देत स्वागत केले. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत १९ महत्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये, बारामती येथील क्रीडा संकुलासाठी ७५ कोटी १३ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकात मंजुरी देण्यात आली. पुणे जिल्ह्यातील पुरंदर विमानतळासाठी विशेष हेतू प्राधिकरणाची स्थापना. प्रकल्पाला गती देण्यासाठी, भुसंपादन व अनुषांगिक बाबींसाठी सहा हजार कोटींचे कर्ज. एमआयडीसी, एमएडीसी आणि सिडको यांची सहभागीदारी, त्यांच्याकडे भागीदारीनुसार कर्ज फेडीची जबाबदारी. या कर्जाला शासन मान्यता व हमी देण्यास मान्यता. पुणे जिल्ह्यातील रत्नपुरी मळा (ता. इंदापूर) येथील एमआयडीसीला जमीन मिळणार. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची रत्नपुरी मळ्यातील एक हजार एकर जमीन नविन औद्योगिक वसाहतीसाठी एमआयडीसीला हस्तांतरीत होणार. यासह अनेक महत्वाचे निर्णय या बैठकीत घेण्यात आले.

-----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. ११ फेब्रुवारी २०२६


## थोडक्यात

### चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या तीन दिवसीय प्रवचन मालेचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे यावर्षी देखील श्री संत धुंडा महाराज देगलूरकर सेवा प्रतिष्ठान माजलगाव आणि राजस्थानी सेवा समाज माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवर्य चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या रसाळ वाणीतून तीन दिवसीय प्रवचन मालेचे आयोजन माजलगाव येथे करण्यात आले आहे. हे प्रवचन मालेचे १६ वे वर्षे आहे. तर प्रवचनाचा विषय हरिपाठ हा असून या अमृतमय प्रवचनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री संत धुंडा महाराज देगलूरकर सेवा प्रतिष्ठान व राजस्थानी सेवा समाज माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे. फाल्गुन शुद्ध १ ते फाल्गुन शुद्ध ३ शके १९४७ अर्थात बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ ते शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी २०२६ दररोज सायंकाळी साडेसहा ते साडेआठ या वेळेमध्ये राजस्थानी मंगल कार्यालय माजलगाव येथे श्री ज्ञानेश्वर माऊलींचा हरिपाठ या विषयावर प्रवचन मालेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व भाविकांनी याचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### माजलगाव तालखेड नाथापूर मार्गे बीड बस सुरू करा -रमेश शेंडगे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव- पुंगणी ते नाथापूर या डांबरी रस्त्याचे काम नुकतेच पूर्णत्वास गेले असून या मार्गावरील नागरिकांच्या सोयीसाठी माजलगाव तालखेड नाथापूर मार्गे बीड बस सेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे विधानसभा विस्तारक रमेश शेंडगे यांनी आगार प्रमुखांकडे निवेदनाद्वारे केली आहे.




पुंगणी ते नाथापूर या रस्त्याच्या कामासाठी सातत्याने पाठपुरावा करून रस्ता दर्जेदार पद्धतीने पूर्ण करून घेण्यात रमेश शेंडगे यांची महत्त्वाची भूमिका राहिली होती. आता रस्ता पूर्ण झाल्यानंतर या मार्गावर बससेवा सुरू झाल्यास परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. माजलगाव तालखेड नाथापूर या मार्गावर अनेक गावे येत असून सावरगाव, हा, लिमगाव, जायकवाडी, जवळा, शहापूर, खेरडा खुर्द फाटा, तालखेड, एकदरा, तेलगाव, पुंगणी डुबा, ईरला, चिंचोली, नांदलगाव, नाथापूर तसेच पिंपळनेर आदी गावांतील नागरिकांना बीड येथे शासकीय कामकाज, शैक्षणिक कारणे, तसेच वैद्यकीय उपचारांसाठी वारंवार प्रवास करावा लागतो. सध्या या मार्गावर थेट बससेवा उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. बससेवा सुरू झाल्यास विद्यार्थी, शेतकरी, कामगार तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठा फायदा होईल, शिवाय ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे राज्य परिवहन महामंडळाने या मागणीचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर बस सेवा सुरू करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### भाई गंगाभीषण थावरे यांच्या आंदोलनाला यश दिव्यांग प्रमाणपत्र देण्यासाठी पथक नियुक्त

माजलगाव । प्रतिनिधी

जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दिव्यांग प्रमाणपत्र देण्यासाठी येथील ग्रामीण रुग्णालयात बीड येथून पथक पाठवून दिव्यांग प्रमाणपत्राचा कॅम्प ठेवला होता परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे तो बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता यावर येतील शेतकरी संघर्ष समितीचे नेते भाई गंगाभीषण थावरे यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. तसेच येथे ग्रामीण रुग्णालयासमोर निदर्शने केली होती या आंदोलनस येस आली असून दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी येथील ग्रामीण रुग्णालयात दिव्यांग व्यक्तीची तपासणी होऊन त्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल असे आदेश जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या आदेशावरून येथील वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर सुरेश साबळे यांनी काढले आहेत. म्हणून या शिबिराचा लाभ दिव्यांग व्यक्तीने घ्यावा असे आव्हान भाई गंगाभीषण थावरे यांनी केले आहे.



या विषयी अधिक माहिती अशी की दिव्यांग व्यक्तीना () देण्यासाठी बीड येथे जावे लागत असे म्हणून भाई आंदोलन करण्या चा इशारा दिला होता याचा परिणाम म्हणून आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी तत्काल दाखल घेऊन दि. ०९/०२/२०२६ पासून महिन्यातील पहिल्या सोमवारी विशेष दिव्यांग शिबिरा चे आयोजन करण्यासाठी आदेशीत करण्यात आले आहे. या अगोदर महिन्यातील पहिला सोमवार दि.०२/फेब्रुवारी/२०२६ रोजी होवून गेल्याने सदरील शिबीर दि.०९ फेब्रुवारी २०२६ रोजी घेणे बाबत जिल्हा रुग्णालयातील दिव्यांग विभागाने कळविले आहे. या आदेशा मुळे भाई गंगाभीषण थावरे यांच्या आंदोलनाला यश आले असून दिव्यांग बांधवात समाधान व्यक्त होत आहे.

# पाटोदा पंचायत समितीची कोट्यवधींची नवी इमारत आठ वर्षांपासून धूळखात!

## प्रशासकीय नाकर्तेपणाचा कळस

**पाटोदा । प्रतिनिधी**

लोकशाहीत जनतेच्या पैशाचा विनियोग कसा करावा, याचा एक 'आदर्श' नमुना पाटोदा पंचायत समितीच्या नवीन इमारतीच्या निमित्ताने समोर आला आहे. तत्कालीन ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्या निधीतून तब्बल पावणे चार कोटी रुपये खर्चून बांधलेली ही टोलेजंग इमारत प्रशासनाच्या बेपर्वाईमुळे गेल्या आठ ते दहा वर्षांपासून कुलूपबंद अवस्थेत धूळखात पडली आहे. केवळ वीज जोडणी नसल्याचे क्षुल्लक कारण देत ही वास्तू जनतेच्या सेवेपासून वंचित ठेवण्यात आली आहे.

नेमके प्रकरण काय?

पाटोदा पंचायत समितीची जुनी इमारत अपुरी पडत असल्याने नवीन भव्य इमारतीचे बांधकाम करण्यात आले. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले, रंगरंगोटी झाली, अगदी नावाचे फलकही लागले. मात्र, मूलभूत गरज असलेली वीज जोडणी न झाल्याने आजतागायत या इमारतीचे लोकार्पण होऊ शकले नाही.

दोन विभागांतील समन्वयाचा अभाव:

या प्रकरणातील सर्वात संतापजनक बाब म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पंचायत समिती प्रशासन यांच्यातील टोलवाटोलवी. बांधकाम विभाग म्हणतो की इमारत हस्तांतरित झाली आहे, तर पंचायत समिती प्रशासन वीज नसल्याने ताबा घेण्यास तयार नाही. या दोन विभागांच्या वादात सर्वसामान्य नागरिकांच्या कररूपातील कोट्यवधी रुपयांचा निधी अक्षरशः मातीत जात आहे.

लोकप्रतिनिधी आणि अधिकारी गप्प का?

एवढी मोठी वास्तू वर्षानुवर्षे पडून असताना स्थानिक लोकप्रतिनिधी, वरिष्ठ पदाधिकारी आणि उच्चपदस्थ अधिकारी यांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिक करत आहेत. पाच वर्षांचा टेंडर कालावधी संपूनही हा प्रश्न मार्गी न लागणे, हे प्रशासकीय अपयशाचे जिवंत उदाहरण आहे. वीज नाही म्हणून इमारत वापरता येत नाही हा खुलासा म्हणजे जबाबदारी झटकण्याचा निर्लज्ज प्रकार असल्याची भावना पाटोदा तालुक्यातील जनतेतून व्यक्त होत आहे. ही केवळ तांत्रिक चूक नसून एक गंभीर प्रशासकीय गुन्हा आहे. या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांची त्वरित चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि तातडीने वीज जोडणी करून ही इमारत कार्यान्वित करावी, अशी जोरदार मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा, ही इमारत प्रशासनाच्या नाकर्तेपणाचा कायमचा डाग म्हणून ओळखली जाईल.




# केवळ पैसा कमावणारा व्यक्ती न होता जबाबदार नागरिक बना -सपोनि सुभाष सानप

### तुलसी व माता रमाई नर्सिंग तसेच ज्युनिअर कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी

आजचा विद्यार्थी हा उद्याचा समाज घडवणारा नागरिक असल्याने केवळ पैसा कमावणारी व्यक्ती होण्यापेक्षा समाजासाठी उपयुक्त व जबाबदार नागरिक बनणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन बीड वाहतूक विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांनी केले.तुलसी शैक्षणिक समूह संचालित तुलसी नर्सिंग कॉलेज, माता रमाई नर्सिंग कॉलेज व तुलसी ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस हवालदार त्रिंबक कुडके, प्रा.अर्जुन राठोड, डॉ.सुनील जोंधळे, प्रा.राम गायकवाड, प्रा.शरद वंजारे, प्रा.डी.जी.निकाळजे, प्रा.डी.डी.राऊत तसेच प्रा.प्रकाश ढोकणे उपस्थित होते.यावेळी सुभाष सानप म्हणाले की, विद्यार्थी वर्षभर अभ्यासाच्या ताणतणावात व्यस्त असतात. स्नेहसंमेलनासारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरण मिळते तसेच विद्यार्थ्यांमध्ये परस्पर ओळख वाढून प्राध्यापक व विद्यार्थ्यांमधील संवाद अधिक दृढ होतो. विविध सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना एकमेकांचे गुण आत्मसात करण्याची संधी मिळते, असे त्यांनी सांगितले.ते पुढे म्हणाले की, आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे शिल्पकार आहेत. महाविद्यालयाचे उद्दिष्ट केवळ पदवी प्रदान करणे नसून विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अनेक ठिकाणी पारंपरिक शिक्षणपद्धतीवर भर दिला जात असताना आपल्या संस्थेत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जात असून त्याचा विद्यार्थ्यांना मोठा लाभ होत आहे. बदलत्या काळानुसार रटाळ शिक्षणापेक्षा नवीन कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.तसेच विद्यार्थ्यांनी अपघात टाळण्यासाठी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, वेळेचे नियोजन आणि दृढ इच्छाशक्ती यांच्या बळावर कोणतेही ध्येय साध्य करता येते, असा प्रेरणादायी संदेश दिला. जगात बदल घडवायचा असेल तर त्याची सुरुवात स्वतःपासून करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. प्राचार्य डी.डी.राऊत यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. यावेळी शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. लावणी,आदिवासी व कोळीगीत तसेच देशभक्तीपर गीतांवरील नृत्य सादरीकरणांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली. विविध सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी आपल्या सुप्त कलागुणांचे उत्कृष्ट दर्शन घडवले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### सांडसचिंचोली वाळू ठेक्यावर

बेबंधशाही मोडीस आनने अपेक्षित असल्याचे ते यावेळी म्हणाले. दरम्यान या ठिकाणी मजुराशिवाय पोकलेनच्या व जेसीबीच्या साहाय्याने कोट्यवधी रुपयांचा वाळू उपसा सुरु असुन महसूल यंत्रणा मात्र हातावर हात ठेवून बसली आहे.हा सर्व प्रकार वाळु ठेकेदाराशी संगनमत करत महसूल प्रशासन हप्ते खाऊन लाचार झाल्यामुळे डोळेझाक करत असल्याचा आरोप पोटभरे यांनी यावेळी केला. दरम्यान पुढ ते असे ही म्हणाले की,जर सांडसचिंचोली ठेक्यावर अशी मनमानी सुरूच राहिली, तर उर्वरित पुढं सुरू होणाऱ्या सहा टेंडरवरही हाच गैरप्रकार उघडपणे होईल.त्यामुळे आज सांडसचिंचोली येथील वाळु ठेक्यावर कार्यवाही झाली नाही तर उद्या तालुक्यातील सहा टेंडरवर वाळू माफियांचे साम्राज्य उभे राहील.हा केवळ नियमभंग नाही, तर जनतेच्या सुरक्षिततेवर घाला आहे.प्रशासनाने तातडीने कारवाई केली नाही,तर बहुजन विकास मोर्चा कडून व्यापक जणआंदोलन छेडले जाईल,असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.या पत्रकार परिषदेला बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे,जेष्ठ नेते नवनाथ धाईजे, प्रदीप पट्टेकर, नगरसेवक अभिजीत पोटभरे, नगरसेवक सचिन जावळे,शेख फेरोज,शेख बाबा, राहुल मस्के,दीपक टाकणखार,अक्षय मोरे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

### आ.सुरेश धस यांच्या

निर्णयाचे स्वागत केले आहे. आमदार सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आल्याने वाढदिवस साजरा करण्याची ही एक आदर्श पद्धत असल्याची भावना पत्रकारांनी व्यक्त केली.पाटोदा तालुका पत्रकार संघटनेच्या वतीने ॲड प्रकाश कवठेकर यांचे आभार मानण्यात आले. ''पत्रकारांच्या सुरक्षिततेचा विचार करून दोन कोटींचा अपघात विमा काढणे ही कौतुकास्पद बाब असून, अशा उपक्रमामुळे पत्रकारांना काम करताना मानसिक आधार मिळतो,'' अशी प्रतिक्रिया पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.समाजातील विविध घटकांसाठी सातत्याने उपक्रम राबविणाऱ्या ॲड प्रकाश कवठेकर यांच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत असून, इतरांनीही पत्रकारांच्या हितासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### जलजीवन मिशन, रेल्वेसाठी

मोठ्या-गाजावाजात जाहीर केलेली सुधार एक्सप्रेस ही संकल्पना केवळ घोषणाबाजीपुरती मर्यादित आहे. सरकारने ३५० हून अधिक सुधारणा केल्याचा दावा केला असला तरी त्या नेमक्या कोणत्या, याचा तपशील सभागृहासमोर मांडण्यात आलेला नाही. जीएसटी व्यतिरक्ति कोणती ठोस सुधारणा झाली, हेही अस्पष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.जीएसटीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, हा कर कोणतीही चर्चा न करता मध्यरात्री लागू करण्यात आला. विरोधकांनी सूचनांचा आग्रह धरला असतानाही सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. आज जीएसटीमुळे व्यापारी, उद्योजक व सामान्य नागरिक अडचणीत आले असून, त्यांच्या नुकसानीची भरपाई सरकार देणार का, असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

### मार्केट कमिटीतील खरेदी-विक्री

शेतमालाला १०००/- ते २५००/- रुपयापर्यंत कमी दर देणाऱ्या खरेदिदाराविरुद्ध शेतकऱ्यांना विनाविलंब तात्काळ नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी निश्चित करावी ,तसेच २०२६ साठी मार्केट कमिटी कडे शेतमाल खरेदी-विक्री परवान्यांचे नूतनीकरणासाठी येणारे प्रस्ताव स्थगित करावेत. अशी निवेदनाद्वारे मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे ,शेकापचे जिल्हा संघटक धनंजय मुळे ,शेतकरी नेते राजेंद्र वीर ,क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड शहराध्यक्ष श्रीकृष्ण कोलंगडे ,महिला आघाडीच्या नयना भाकरे यांनी जिल्हाधिकारी बीड,जिल्हा उपनिबंधक,बीड ,जिल्हा मार्केटिंग अधिकारी ,कृषि पणन मंडळ ,बीड यांना केली आहे.

### वंजारवाडी तलाव, पाटाच्या

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी व्हिजेएनटी सेलचे तालुकाध्यक्ष केशव तांदळे यांनी व्यक्त केले. या प्रकल्पाच्या दुरुस्तीमुळे वंजारवाडी, राजुरी, तिप्पटवाडी, रुई-लिंबा, मुर्शदपूर, तांदळवाडी, पिंपरगव्हान, शहाजहानपूर आदी गावांतील शेतकऱ्यांना थेट लाभ होणार असून नवगण राजुरी सर्कलमधील सिंचनाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागल्याने परिसरातील शेतीला नवसंजीवनी मिळणार आहे. स्व. अजितदादा पवार यांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी तसेच राजुरी जिल्हा परिषद सर्कलचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी कटिबद्ध असल्याचेही केशव तांदळे यांनी स्पष्ट केले.

### मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी

मोफत अन्नदान, कावड व्यवस्था, मळी काढणे, सुरक्षा व्यवस्था, विद्युत व पाणीपुरवठा, आरोग्य सेवा तसेच इतर आवश्यक व्यवस्थांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने व जबाबदारीने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला संजीवन समाधी उघडण्यात आल्यानंतर दुसऱ्या दिवशी सूर्योदयापूर्वी ती पुन्हा झाकण्यात येते. या कालावधीत मच्छिंद्रनाथांच्या संजीवन समाधीवर गंगाजल व चंदनाने अभिषेक करण्यात येतो. यावेळी मोठी यात्रा भरत असून हा सोहळा नाथभक्तांसाठी श्रद्धा व भक्तीचा केंद्रबिंदू ठरतो. नाथ संप्रदायातील ही प्राचीन अध्यात्मिक परंपरा श्रद्धा व भक्तीचे प्रतीक मानली जाते. श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड, सावरगाव मायंबा हे नाथ संप्रदायातील अत्यंत महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून या संजीवन समाधी सोहळ्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे.

# बाल विवाह व बाललैंगिक अत्याचार कायद्याबाबत जनजागृती शिबिर

बीड । प्रतिनिधी

आज दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता किमान समान कार्यक्रमाअंतर्गत मा. श्री. आनंद एल. यावलकर साहेब, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली ''बाल विवाह व बाललैंगिक अत्याचार कायद्याबाबत'' बालकांचे हक्क, या विषयावर ग्रामीण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नेकनूर ता.जि. बीड येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. जगदीशराव शिंदे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून न्या. डॉ. वहाब अ. सय्यद सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, तत्वशील कांबळे अधिकारमित्र, श्री. शां.तु.शिंदे अधिक्षक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, प्राचार्य श्री. रघुनाथ रुचके आदी उपस्थित होते.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, न्या.डॉ. वहाब अ. सय्यद यांनी बालकांचे हक्क समाजामध्ये प्रस्थापित झाले पाहिजेत यासाठी त्यांचे जनजागृती करणे गरजेचे आहे. तसेच, बालकांनी कायद्याची माहिती घेऊन कायद्याचे पालन कटाक्षाने केले पाहिजे. मुलींना स्वतःच्या हक्काबाबत जागृत होणे गरजेचे आहे असे आवाहन केले. ज्यामुळे बालकांना त्यांच्या हक्काची जाणीव होईल व बालकांना कुठल्याही कायदेशीर प्रक्रियेत ते अडकणार नाहीत व जरी अडचण आल्यास १०९८, १५१०० व विधी सेवा कार्यालया सोबत संपर्क करा अशी माहिती



दिली. अधिकारमित्र तत्वशील कांबळे यांनी बालकांना बालकांचे लैगिंक शोषणापासुन सरंक्षण कायदा २०१२ व बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ याविषयी सखोल मार्गदर्शन करताना विद्यार्थीनींना प्रश्नावलीच्या माध्यमातुन बालहक्काच्या संदर्भात सविस्तर माहिती दिली. बीड जिल्हयात घडलेल्या विविध घटना बालविवाह थांबवल्यानंतर बालकांचे पुर्नवसन यासाठी शासनांकडून मदत पुरवल्या जाते व बालक परत शिक्षणाच्या मुळ प्रवाहात येऊ शकतो त्यामुळे कोणत्याही बालकांला शिक्षणांची , निवासाची, सुरक्षेची, आरोग्याची अडचण असल्यास आपण हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून मदत मिळवावी व बालकांचे बालविवाह, बाललैंगिक शोशण होण्यापासून थांबवावे. जगण्याचा अधिकार, शिक्षण इतर अधिकार बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. मुलगी व मुलगा यांमध्ये कोणतेही मतभेद न होता मुलींनासुध्दा समान अधिकार संविधानामार्फत उपलब्ध झाल्याचे त्यांनी सांगितले.

# बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीच्या वतीने विमा धनादेश खातेदाराच्या वारसास प्रदान

किल्लेधारूर । प्रतिनिधी

धारूर येथील बुलढाणा अर्बन कॉप क्रेडिट सोसायटीचे कर्जदार सभासद संतोष शिवाजी मिसाळ यांचे अपघाती निधन झाले होते त्यांच्या सोने तारणवर त्यांच्या वारसास विमा धनादेशाची रक्कम बँकेच्या वतीने प्रदान करण्यात आली या को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे

बुलढाणा अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी शाखा धारूर च्या वतीने मयत कर्जदार सभासदाचे वारस विमा धनादेश वितरण करण्यात आला सहकाराची समृद्ध परंपरा जतन करण्या बरोबर सहकाराला सामाजिक कार्याची जोड देऊन ग्राहक लघुउद्योग व शेतकरी सभासदांच्या हितासाठी आर्थिक व सोशल बँकिंग राबवणारी आशिया खंडातील प्रथम क्रमांकाची संस्था म्हणून नावलौकिक मिळवणाऱ्या संस्थेच्या बीड विभागातील शाखा धारूर च्या वतीने मयत कर्जदाराच्या वारसास विमा धनादेशाचे वितरण करण्यात आले मु. कोल्हेवाडी



पो. लव्हरी ता. केज जि. बीड येथील रहिवासी व संस्थेचे सभासद संतोष शिवाजी मिसाळ यांनी दिनांक २० सप्टेंबर २०२४ रोजी शाखा धारूर येथून सोने तारण कर्ज रक्कम रुपये ५० हजार घेतले होते दरम्यान त्यांचा दिनांक १५ आक्टोबर २०२५ रोजी अपघाती दुर्दैवी मृत्यू झाला संस्थेच्या वतीने ठेवीदाराला ठेवी रकमे एवढे व कर्जदारास कर्ज रकमे एवढे अपघाती विमा संरक्षण देण्यात येते. सदर घटनेची माहिती मिळतात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री रामेश्वरजी चांडक भाईजी संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. सुकेशजी झंवर व संस्थेचे सरव्यवस्थापक कैलासजी कासट यांच्या आदेशानुसार तसेच बीड विभागाचे विभागीय व्यवस्थापक माधव मगर यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा व्यवस्थापक बप्पासाहेब लांडे यांनी मिसाळ परिवाराचे सांत्वन करून मयत सभासदाच्या वारसास लागू असलेल्या अपघाती विमा संबंधी माहिती दिली त्यावेळी मिसाळ परिवाराकडून आवश्यक ती सर्व कागदपत्राची पूर्तता करून विमा प्रस्ताव मुख्यालयाकडे सादर करण्यात आला या योजनेअंतर्गत जुनीच कोटक जनरल इन्शुरन्स कंपनीने मयत कर्जदार संतोष शिवाजी मिसाळ यांच्या कर्जाच्या व्याजासह पूर्ण रकमेचा ५८ हजार रुपयांचा क्लेम मंजूर करून मयत खातेदाराचे सभासद यांच्या वारसदार श्रीमती कोमल संतोष मिसाळ यांच्या सोने तारण कर्ज खात्यातील सोने चीज वस्तू विभागीय व्यवस्थापक माधव मगर यांच्या हस्ते देण्यात आले त्यावेळी धारूर शाखेचे शाखा व्यवस्थापक बप्पासाहेब लांडे व कर्मचारी ठेविदार ग्राहक, सभासद उपस्थीत होते.

# सोलर कृषी पंप नादुरुस्त; कंपन्यांकडून शेतकऱ्यांची अडवणूक!

## पाच वर्षांची वॉरंटी कागदावरच; दुरुस्तीसाठी शेतकरी मारताहेत हेलपाटे

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागात शेतकर्यांना मागेल त्याला सोलर पंप या योजनेत शासनाच्या सौर कृषी पंप योजनेअंतर्गत शेतात बसवण्यात आलेले सोलर पंप आता शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरू लागले आहेत. पाच वर्षांच्या दुरुस्तीच्या हमीवर (वॉरंटी) हे पंप बसवण्यात आले खरे, मात्र ते नादुरुस्त झाल्यावर संबंधित कंपन्या दुरुस्तीसाठी टाळाटाळ करत असल्याचा संतापजनक प्रकार ग्रामीण भागात समोर येत आहे. यामुळे ऐन पिकाच्या हंगामात पाणी असूनही पिके जळून जाण्याची भीती निर्माण झाली आहे.विशेष म्हणजे महावितरण कंपनीच्या ऑपवरुन तक्रार करुनही संबधित सोलर कंपनी असल्याची दाद देत नसल्याने हवालदिल शेतकर्यांनी कोणा कडे दाद मागावी अशा प्रश्न पडला आहे.



सरकाराने अतिशय चांगली योजना आणली मात्र गुत्तेदार कंपनी व महावितरण अधिकारी यांनी या योजनेचा पुरता बट्याबोळ केला आहे. शासकीय योजनेतून सवलतीच्या दरात मिळालेले हे सौर पंप सुरुवातीला व्यवस्थित चालले, मात्र काही महिन्यांतच त्यामध्ये तांत्रिक बिघाड होण्याचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये प्रामुख्याने: कंट्रोलरमध्ये बिघाड: अनेक पंपांचे कंट्रोलर जळण्याच्या तक्रारी आहेत. केबल आणि तांत्रिक दोष: जमिनीखालील केबल खराब होणे किंवा मोटार न फिरणे. सर्व्हिसचा अभाव: तक्रार नोंदवण्यासाठी दिलेले टोल-फ्री क्रमांक अनेकदा लागत नाहीत किंवा लागल्यास तांत्रिक कर्मचारी वेळेवर येत नाहीत.

वॉरंटी फक्त नावापुरतीच!

नियमानुसार, सौर पंप बसवणाऱ्या कंपनीला पाच वर्षांपर्यंत मोफत दुरुस्ती आणि देखभालीची जबाबदारी देण्यात आली आहे. मात्र, शेतकरी जेव्हा तक्रार करतात, तेव्हा कंपन्यांचे प्रतिनिधी ''सुटे भाग उपलब्ध नाहीत'' किंवा ''नैसर्गिक आपत्तीमुळे बिघाड झाला आहे'' अशी कारणे देऊन हात झटकत आहेत. काही ठिकाणी तर दुरुस्तीसाठी शेतकऱ्यांकडून बेकायदेशीरपणे पैशांची मागणी केली जात असल्याचेही वृत्त आहे.

''आम्ही लाखो रुपये खर्चून शेती करतो, पण वेळेवर पाणी मिळाले नाही तर पीक हातातून जाईल. कंपनीचे अधिकारी फोन उचलत नाहीत आणि कार्यालयात गेल्यावर उडवाउडवीची उत्तरे मिळतात. ही तर आमची शुद्ध फसवणूक आहे.'' एक त्रस्त शेतकरी

**शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई ची मागणी**

सध्या अनेक भागांत कडाक्याचे ऊन पडू लागले असून पिकांना पाण्याची नितांत गरज आहे. सोलर पंप बंद असल्याने विहिरीत पाणी असूनही ते शेतापर्यंत पोहोचवता येत नाही. यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून, कृषी विभाग आणि महावितरणने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

पुढील पाऊल काय असावे?

जर कंपनी दाद देत नसेल, तर शेतकऱ्यांनी सामूहिकरीत्या जिल्हाधिकारी किंवा संबंधित विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे लेखी तक्रार नोंदवणे आवश्यक आहे. तसेच, ग्राहक मंचाचा पर्यायही उपलब्ध आहे.

**स्पान कंपनी कडुन दुरुस्तीची टाळाटाळ**

स्पान सोलर सौर पंप कंपनी अत्यंत नावाजलेले कंपनी आहे, मात्र या कंपनीतील काही भष्ट व कामचुकार इंजिनिअर हे कंपनीचा लाखो रुपये पगार घेत कामचुकारपणा करत कंपनीची बदमानी करत आहेत, त्यांच्यावर कंपनीने तातडीने कारवाई करण्याची मागणी शेतकरी करत आहेत.


## बीड नगर परिषद, बीड

बीड नगर परिषद यांच्या वतीने नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून बीड नगर परिषद अंतर्गत वाहनासाठी GPS सिस्टम बसविणे या कामासाठी निविदा मागविण्यात येत आहे. सविस्तर माहिती कार्यालय नगर परिषद बीड येथे दिनांक ०९/०२/२६ रोजी ११:०० वाजलेपासून दिनांक- १६/०२/२०२६ रोजी १६:०० वाजेपर्यंत पहाता व भरता येईल. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार नगर परिषद बीड यांनी राखून ठेवला आहे.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद बीड**

# पीएम किसान योजनेचे ६ हजार रुपये मिळवण्यासाठी काय करावं?

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना देशभरातील लाखो शेतकऱ्यांसाठी एक मोठा दिलासा देणारी योजना आहे. केंद्र सरकारच्या या महत्त्वाकांक्षी योजनेद्वारे, दरवर्षी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ६००० रुपयांची आर्थिक मदत थेट हस्तांतरित केली जाते. आतापर्यंत, सरकारने या योजनेअंतर्गत २१ हप्ते जारी केले आहेत, प्रत्येक वेळी शेतकऱ्यांच्या खात्यात २००० पाठवले जातात. सध्या, देशभरातील शेतकरी २२ व्या हप्त्याची वाट पाहत आहेत. दरम्यान, सर्वात मोठा प्रश्न आहे की, नवीन नोंदणीकृत शेतकऱ्यांना २२ व्या हप्त्याचा लाभ मिळू शकेल का? जाणून घेऊयात याबाबतची माहिती. जर तुम्ही अद्याप पीएम किसान सन्मान निधी योजनेत सामील झाला नसाल तर निराश होऊ नका. ज्या शेतकऱ्यांकडे जमीन आहे ते पोर्टलला भेट देऊन नवीन नोंदणी करू शकतात. तुमच्या आधार आणि जमिनीच्या कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज करून, तुम्हालाही २००० रुपयांचा हप्ता मिळू शकतो.



जर तुम्ही शेतकरी असाल आणि काही कारणास्तव अद्याप पंतप्रधान किसान योजनेत सामील होऊ शकला नसाल, तर निराश होण्याची गरज नाही. तुमच्याकडे अजूनही संधी आहे. जर तुम्ही पात्रता निकष पूर्ण केले तर तुम्हाला २२ वा हप्ता मिळू शकतो. सर्वात महत्त्वाची अट म्हणजे अर्जदाराच्या नावावर शेतीयोग्य जमीन असणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी, तुम्ही स्वतःला शेतकरी म्हणून स्पष्टपणे ओळखणे आणि तुमच्या नावावर जमिनीच्या मालकीचे कागदपत्रे असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जर तुम्ही आत्ताच अर्ज केला आणि तुमच्या अर्जाची वेळेत पडताळणी झाली, तर सरकार २२ वा हप्ता जारी करेल तेव्हा तुम्हाला तुमच्या खात्यात २००० रुपये जमा होतील. तुमचा अर्ज बरोबर असल्याचे आढळल्यास आणि यशस्वीरित्या पडताळणी झाली तरच ही रक्कम उपलब्ध आहे.

नोंदणीसाठी कोणती कागदपत्रे आवश्यक असतील? : ग्रामीण भागात राहणाऱ्या शेतकऱ्यांना सहजपणे सहभागी होता यावे म्हणून सरकारने अर्ज प्रक्रिया सोपी आणि सुलभ केली आहे. पात्र शेतकरी त्यांच्या क्षेत्रातील महसूल अधिकारी किंवा गावातील पटवारींशी संपर्क साधू शकतात. याव्यतिरिक्त, जवळच्या कॉमन सर्व्हिस सेंटर () ला भेट देऊन देखील नोंदणी करता येते. जर तुम्ही तंत्रज्ञानात हुशार असाल तर तुम्ही - पोर्टलवर स्वतःची नोंदणी देखील करू शकता.

अर्ज करताना, तुम्हाला काही महत्त्वाच्या कागदपत्रांची आवश्यकता असेल. यामध्ये नागरिकत्वाचा पुरावा, आधार कार्ड, बँक खात्याचा तपशील आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जमिनीची मालकी दर्शविणारी कागदपत्रे समाविष्ट आहेत. या कागदपत्रांशिवाय अर्ज प्रक्रिया पूर्ण मानली जाणार नाही, म्हणून ती आगाऊ तयार ठेवणे शहाणपणाचे आहे.

## कोळशाचा वापर करून वाढवा मातीची उत्पादकता



आजपर्यंत आपण कोळशाचे वेगवेगळे उपयोग बघितले आहेत, सध्या तर टूथपेस्ट मध्ये चारकोल म्हणजेच कोळशाचा वापर केला जातो अशा जाहिराती सुद्धा येतात. परंतु शेतकरी बंधुंनो तुम्हाला माहित आहे का या कोळशाचा खत म्हणून सुद्धा वापर करू शकता. कोळसा जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी उपयुक्त आहे. तुम्ही बाजारातून कोळसा विकत घेऊ शकता किंवा घरी बनवू शकता.

चारकोल म्हणजे लाकूड कोळसा, तुम्ही त्याचा खत म्हणूनही वापर करू शकता. चारकोल किंवा बायोचार शेतीसाठी खूप फायदेशीर ठरतात आणि जमिनीची सुपीकता वाढवतात. तुम्हाला हवे असल्यास ते तुम्ही घरी बनवू शकता किंवा बाजारातून विकले जाते, ते विकत घेऊन शेतात टाकू शकता.

घरी कोळसा कसा बनवायचा :

जर तुम्हाला ते घरी बनवायचे असेल तर तुम्ही ड्रम पद्धत वापरू शकता. जे हैदराबाद येथील सेंट्रल रेनफेड कृषी संशोधन संस्थेने तयार केले आहे. त्यात एक ड्रम असतो ज्यामध्ये कोळसा तयार केला जातो. या पद्धतीत बायोमासचे अवशेष ड्रममध्ये ठेवून त्याला आग लावली जाते. हा ड्रम ९०-९५ मिनिटे चुलीवर ठेवला जातो. नंतर ते खाली उतरवले जाते, त्याचे झाकण बंद केले जाते आणि त्यावर ओली माती झाकली जाते. यापासून कोळसा तयार केला जातो. शेतकरी आपल्या शेतात या कोळशाचा वापर करून पीक उत्पादन वाढवू शकतात. पेरणीपूर्वी आणि उभ्या पिकात शेताची नांगरणी करताना १०-१५ सेमी खोलीवर कोळशाची भुकटी टाकावी. हे एकाच वेळी मोठ्या प्रमाणात किंवा लहान प्रमाणात अनेक वेळा वापरले जाऊ शकते. काही प्रमाणात खत कमी करून आणि त्या जागी काही प्रमाणात बायोचार वापरूनही उत्पादनात वाढ करता येते.

कोळशाचे फायदे : कोळसा पिकांसाठी कितपत फायदेशीर आहे हे तो कोणत्या तापमानाला तयार होतो यावर अवलंबून असतो. जर तापमान जास्त असेल तर त्यातील पोषक द्रव्ये मरतात, तर ५००-६०० अंश सेल्सिअस तापमानात तयार केलेला कोळसा जमिनीला अधिक फायदे देतो. अशा कोळशामुळे जमिनीची सुपीकता वाढते. कमी तापमानात बनवलेल्या कोळशामध्ये किंवा बायोचारमध्ये पोषक तत्वे नष्ट होत नाहीत. त्यामुळे ते शेतीसाठी योग्य मानले जाते. कोळशामुळे जमिनीतील सूक्ष्मजीवांचे प्रमाण वाढते.

पीक उत्पादन वाढवण्याबरोबरच कोळशामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते. पीक पेरण्यापासून ते तयार होईपर्यंत कोळशाचा वापर करता येतो. हे पिकांना सुरुवातीच्या अवस्थेतच अधिक पोषक तत्वे पुरवते, ज्यामुळे त्यांची वाढ सुधारते. त्यामुळे झाडांची मुळे, देठ, फुले, फळे यांची चांगली वाढ दिसून येते. कोळशामुळे जमिनीची आम्लताही कमी होते आणि सामू सुद्धा योग्य राहते.

## उसाच्या पाचटापासून मिळवा उत्तम सेंद्रिय खत

ऊस तोडणीनंतर उसाचे पाचट जाळून टाकण्याकडे शेतकऱ्यांचा कल असतो. त्यामुळे नायट्रोजन, कार्बन आणि गंधक हे अन्नघटक वाया जातात. शिवाय जमीन भाजली गेल्याने जमिनीतील उपयुक्त जिवाणूंचा नाश होतो पाचट जाळण्याची मानसिकता बदलून पाचटापासून सेंद्रिय खत तयार केल्यास त्यातून खताची उपलब्धता होऊ शकते वाढत्या महागाई सोबत ऊस उत्पादन खर्चात वाढ होत आहे. रासायनिक खतांचा असंतुलित पद्धतीने वापर केला जातो. त्यातून ऊस पिकाखालील क्षेत्र क्षारपड होण्याचा धोका आहे उसापासून दर हेक्टरी ७ ते ८ टन पाचट उपलब्ध होते. या पाचटाचे सेंद्रिय खत बनविणे हा चांगला पर्याय आहे.

पाचट चिवट असल्याने ते लवकर कुजत नाही. त्याचे लवकर विघटन करण्यासाठी जिवाणूंचा वापर करावा लागतो. त्यासाठी पाचटाचे लहान लहान तुकडे करावेत. पाचटाचे लवकर विघटन होण्यासाठी शेण, माती व पाणी यांचा वापर करावा. पाचटात सेंद्रिय कर्ब प्रमाण जास्त (४५ टक्के) व नत्र कमी (०.३५ टक्के) असल्याने कर्ब नत्र प्रमाण जास्त असते. त्यामुळे पाचटाचे लवकर विघटन होण्यासाठी नत्रपुरवठा युरियामार्फत करावा लागतो.

पाचट खतामधील नत्र प्रमाण कमी होऊ नये म्हणून सुपर फॉस्फेट वापरावे. अशा कंपोस्टमधील स्फुरदाची पिकास उपलब्धता वाढते.

पाचट कुजविण्याच्या विविध पद्धती

१) खड्डा पद्धत : ऊस पाचटाचे कंपोस्ट ढीग किंवा खड्डा पद्धतीने करता येते एक टन ऊस पाचटापासून कंपोस्ट करण्यासाठी ४ मीटर लांब, २ मीटर रुंद व १ मीटर खोल खड्डा तयार करावा. त्यात तुकडे केलेले पाचट २५ ते ३० सेंमी. जाडीच्या थराने भरावे. प्रत्येक थरावर पाचट ओले करून त्यावर जिवाणु मिश्रित शेणकाला शिंपडावा, तसेच युरिया, सुपर फॉस्फेट टाकावे. एक टन पाचटास १०० किलो शेणाचा काला वापरावा यासाठी शेणकाला करताना शेण व पाणी १:५ प्रमाणात वापरावे.

सर्व थर भरून झाल्यावर पाचटाची वरील बाजू चिखलमातीने बंद करावी. साधारणपणे दीड ते दोन महिन्यांनी खड्डा उघडावा. थरामधील पाचट चांगले मिसळून घ्यावे. त्या वेळी थोडे पाणी शिंपावे व खड्डा पुन्हा चिखलमातीने बंद करावा. कंपोस्ट खतास तपकिरी काळसर रंग येतो व ते सहज कुस्करले जाते. ऊस पाचट खतामुळे शेणखताप्रमाणेच जमिनीची सुपिकता व पीक उत्पादकता वाढते.

२) ढीग पद्धत : ही पद्धत खड्डा पद्धतीसारखीच आहे. फक्त पाचट खड्ड्यात टाकून कुजवण्याऐवजी ढीग करून कुजवतात.

३) खोडवा उसात पाचट कुजविणे

शेतात जागेवरच कुजविल्यास खोडवा पिकास उपयुक्त ठरते. यासाठी ऊस तोडणी झाल्यावर राहिलेले पाचट कुट्टी करून एक सरी आड दाबून घ्यावे. साधारणतः एक एकर क्षेत्रासाठी १६ किलो युरिया व २० किलो सिंगल सुपर फॉस्फेटचे २०० लिटर पाण्यामध्ये केलेले द्रावण कीटकनाशकाच्या पंपाचा नोझल काढून सरीमधील पाचटावर फवारावे. यावर दोन किलो कंपोस्ट जिवाणू संवर्धन शेणकाल्यामधून एक एकर क्षेत्रावरील पाचटावर शिंपडून हलकेसे पाणी द्यावे.

पाचट थोडेसे दाबल्यानंतर रिजरच्या साह्याने बगला फोडून माती पाचटावर टाकल्यास पाचट जागेवर कुजते जमिनीची उत्पादकता कायम टिकविण्यासाठी जिवाणू खते व पीक फेरपालटीचा अवलंब करण्याबरोबरच सेंद्रिय खतांचा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे.




## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

६६० : सम्राट जिम्मु यांनी जपानचे राष्ट्र निर्माण केले.
१६६० : औरंगजेबाने मुख्तारखान याला दख्खनेची जबाबदारी देऊन औरंगाबाद येथे पाठवले.
१७५२ : पेनसिल्व्हानिया हॉस्पिटल या अमेरिकेतील पहिल्या हॉस्पिटलचे बेंजामिन फ्रँकलिनच्या हस्ते उद्घाटन झाले.
१८२६ : लंडन विद्यापीठाची स्थापना.
१८१८ : इंग्रजांनी अजिंक्यतारा किल्ला ताब्यात घेतला.
१८३० : मुंबईचे हंगामी राज्यपाल सर सिडने ब्रेकनिथ यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन ऍग्री हॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेची स्थापना झाली.
१९११ : हेन्री पिके याने हंटर जातीच्या विमानातून भारतातील पहिली 'एअर मेल' अलाहाबादवरुन नैनी या १० किलोमीटर अंतरावरील गावाला वाहून नेली.
१९२९ : पोप पायस (११ वा) आणि बेनिटो मुसोलिनी यांच्यात झालेल्या 'लॅटेरान ट्रिटी' या विशेष करारानुसार 'व्हॅटिकन सिटी' हे शहर राष्ट्र इटालीतुन वेगळे करण्यात आले. कॅथॉलिक ख्रिश्चनांचे हे प्रमुख धर्मपीठ आहे.
१९३३ : आजच्या दिवशी महात्मा गांधी यांनी हरिजन या साप्ताहिकाची सुरुवात केली.
१९७९ : पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी अंदमान निकोबार बेटावरील सेल्युलर जेल राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केले.
१९९० : २७ वर्षांच्या तुरुंगवासानंतर नेल्सन मंडेला यांची तुरूंगातुन सुटका
१९९७ : खगोलशास्त्री ''जयंत वी नार्लीकर'' यांना १९९६ चा युनेस्को कलिंग पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
१९९९ : मध्यप्रदेश सरकारतर्फे दिला जाणारा लता मंगेशकर पुरस्कार प्रसिद्ध संगीतकार इलियाराजा यांना जाहीर.
२०११ : १८ दिवसांच्या जनआंदोलनानंतर होस्नी मुबारक यांना इजिप्तची सत्ता सोडणे भाग पडले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७५० : आजच्या दिवशी आदिवासी लीडर तिलका मांझी यांचा जन्म.
१८०० : हेन्री फॉक्स टॅलबॉट - छायाचित्रणकलेचा पाया घालणारे (मृत्यू: १७ सप्टेंबर १८७७)
१८३९ : अल्मोन स्ट्राउजर - अमेरिकन संशोधक टेलिफोन एक्सचेंज (मृत्यू: २६ मे १९०२)
१८४७ : थॉमस अल्वा एडिसन - अमेरिकन संशोधक आणि उद्योजक (मृत्यू: १८ आक्टोबर १९३१)
१९३७ : बिल लॉरी - ऑस्ट्रेलियन क्रिकेटर
१९४२ : गौरी देशपांडे - कादंबरीकार, लघुकथालेखिका आणि कवयित्री (मृत्यू: १ मार्च २००३)
१९५६ : भारतीय माजी क्रिकेटर सोभा पंडित यांचा जन्म.
१९५७ : प्रसिद्ध अभिनेत्री टीना अंबानी यांचा जन्म.
१९६१ : भारतीय चित्रपट अभिनेता रजत कपूर यांचा जन्म.
१९६७ : पद्मश्री पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध भारतीय गायिका मालिनी अवस्थी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६५० : रेने देकार्त - फ्रेन्च तत्त्वज्ञ व गणितज्ञ (जन्म: ३१ मार्च १५९६)
१९४२ : जमनालाल बजाज - प्रसिद्ध गांधीवादी कार्यकर्ते, स्वातंत्र्यसैनिक आणि बजाज उद्योगसमुहाचे प्रणेते (जन्म: ४ नोव्हेंबर १८८४)
१९६८ : पण्डित दीनदयाळ उपाध्याय - तत्त्वज्ञ, अर्थतज्ञ, समाजशास्त्री, इतिहासकार, पत्रकार, राजकीय नेते आणि जनसंघाचे एक संस्थापक यांची अज्ञात मारेकर्याकडुन हत्या (जन्म: २५ सप्टेंबर १९१६)
१९७७ : फक्रुद्दीन अली अहमद - भारताचे ५ वे राष्ट्रपती. १९७४ च्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत इंदिरा गांधींच्या नेतृत्त्वाखालील काँग्रेसतर्फे ते निवडून आले. २५ जून १९७५ रोजी आणीबाणीची घोषणा त्यांच्याच कारकिर्दीत करण्यात आली. (जन्म: १३ मे १९०५)
१९८६ : तत्त्वज्ञ, अर्थतज्ञ, समाजशास्त्री, इतिहासकार, पत्रकार, राजकीय नेते पण्डित दीनदयाळ उपाध्याय यांची अज्ञात मारेकर्याकडुन हत्या. (जन्म: २५ सप्टेंबर १९१६)
१९८९ : ला प्रसिद्ध लेखक पंडित नरेंद्र शर्मा यांचे निधन.
१९९३ : सईद अमीर हैदर कमाल नक्वी ऊर्फ 'कमाल अमरोही' चित्रपट निर्माता, दिग्दर्शक, संवादलेखक, पटकथाकार व कवी (जन्म: १७ जानेवारी १९१८)
२००७: भारतीय चित्रपट अभिनेता युनुस परवेझ यांचे निधन.

## वाढत्या उन्हात संकरित गायींची घ्या काळजी



देशी गाई वाढते तापमान सहन करु शकतात. पण संकरित गायींना वाढत्या तापमानाचा ताण सहन होत नाही. त्यामुळे संकरित गायींच्या आरोग्यावर परिणाम होऊन त्यांच दूध उत्पादन कमी होते. त्यामुळे उन्हाळ्यात संकरित गायींची विशेष काळजी घ्यावी लागते.

वातावरणातील तापमान वाढल्याने संकरित गाई त्यांच्या शरीराचे तापमान वाढू नये आणि ते सर्वसाधारण राहावे यासाठी प्रयत्न करते. पहिल्यांदा शरीरात तयार होणारी ऊर्जा शरीराबाहेर ढकलते आणि दुसरे म्हणजे शरीरात कमीत कमी ऊर्जा तयार होण्यासाठी दैनिक व्यवस्थापनात बदल करते. सर्वसाधारणपणे संकरित गाईसाठी ३३ अंश सेल्सिअस तापमान भारतीय गोवंश आणि म्हशीसाठी ३६ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान योग्य समजले जाते. तापमान ज्या वेळेस जास्त होते, त्या वेळेस जनावरे आपल्या शरीराचे तापमान घर्मग्रंथी किंवा धापण्याच्या प्राक्रियेमार्फत नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतात. ज्या वेळी वातावरणातील तापमान या कक्षेबाहेर जाते म्हणजे कमी किंवा जास्त होते अशा वेळी जनावराला शरीरावर होणाऱ्या विपरीत परिणामांचा ताण सहन करावा लागतो.

वाढत्या तापमानाचा संकरित जनावराच्या शरिरावर होणार परिणाम :१) शरीरात तयार होणारी ऊर्जा जनावर बाहेर टाकत असते परंतु अशा वेळेस बाहेरील तापमान वाढल्याने ऊर्जा बाहेर टाकण कठीण होते. त्यातच बाहेरील ऊर्जेचा अधिक भार वाढल्याने जनावराच्या ऊर्जा निस्सारण यंत्रणेवर परिणाम होतो. २) संकरित जनावराच्या हार्मोन्स निर्मितीत बदल होतो, त्यामुळे दूध उत्पादन,आरोग्य, आहार आणि प्रजननावर विपरीत परिणाम होतो. ३) शरीरातील अन्नघटक हे तापमान नियंत्रणासाठी वापरल्याने जनावर अस्वस्थ होते. आहार कमी होऊन तहान, भूक मंद होते. जनावर तापमान नियंत्रण करण्यासाठी स्वतःची यंत्रणा वापरण्यास सुरवात करते. यामध्ये श्वासोच्छ्वासाचा दर वाढून धाप लागल्यासारखे करते. तोंडाने श्वासोच्छ्वास करते. श्वासोच्छ्वास उथळ, जास्त वेगाने होतो. नाडीचा वेग वाढतो. ४) जनावर स्वत: तपमान नियंत्रण करण्यापलीकडे जाते. शरीराचे तापमान १०४ ते १०६ अंश फॅरानहाइट वाढून कातडी कोरडी पडते. डोळे लालसर होतात, डोळ्यांतून पाणी गळते. पित्ताचा त्रास होऊन अतिसार होण्याची शक्यता असते. लघवीचे प्रमाण कमी होते. जनावरे बसतात. गाभण गायी गाभडण्याचे प्रमाण वाढते. ५) ज्या वेळेस तापमान ३५ अंश सेल्सअसपेक्षा जास्त होते, त्यावेळेस दूध उत्पादनात ३० टक्क्यांपर्यंत घट येऊ शकते आणि जेव्हा हेच तपमान ४० अंश सेल्सअसपेक्षा जास्त जाते त्या वेळेस दूध उत्पादनामध्ये ५० टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते. योग्य काळजी न घेतल्यास ही घट वाढत जाते. ६) उष्णतेच्या परिणाम वासरे, कालवडींच्या वाढीवर अधिक प्रमाणात होत असतो. दुधातील स्निग्धांश व प्रथिनाचे प्रमाण कमी होते. आहार कमी होतो. ७) प्रजनन यंत्रणेवर परिणाम होते. उष्णतेचा ताण असणारी गाय माजावर येत नाही. गाभण राहण्यास अडचणीचे ठरते. गाभण गाईंना उष्णतेचा ताण बसल्यास गर्भपात होऊ शकतो किंवा अकाली प्रसूती होऊ शकते. खुरांचे आजार तसेच लंगडेपणा वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे जास्त तापमानात संकरित गायींची अधिक काळजी घ्यावी लागते.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत





# कृषीप्रधान भारतासाठी 'एआय' तंत्रज्ञान मैलाचा दगड ठरेल-जिल्हाधिकारी मित्तल

जालना । प्रतिनिधी

सध्याच्या धावपळीच्या युगात प्रत्येक गोष्टीतील बारकावे मानवी बुद्धिमत्तेत साठवून ठेवणे आणि ते वेळेवर आठवणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत माहितीचे अचूक विश्लेषण करण्यासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. भारतातील संगणक क्रांतीनंतरचा हा सर्वात मोठा बदल असून कृषीप्रधान भारतासाठी एआय तंत्रज्ञान मैलाचा दगड ठरेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात कृत्रिम बुध्दीमत्तेद्वारे कृषी तंत्रज्ञानाची प्रगती या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास प्रमुख्य वक्ते म्हणून फाइंडॅबिलिटी सायन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद माहुरकर, मॅजिकचे मकरंद कुलकर्णी, रितेश मिश्रा, डॉ.प्रसन्न भोगले यांच्यासह डॉ.मंदार कुलकर्णी, डॉ.दीपक बोरनारे, डॉ.गोपाळ शिंदे, प्रसाद कोकिल, सौरभ कदम, पुजा गोशेर, पी.टी.यशराज, मॅजिकचे व्यवस्थापक डी.एम.राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, भारत हा कृषिप्रधान देश असल्याने शेतीमधील पिकांचे नियोजन, हवामानाचा अंदाज आणि कीड नियंत्रण यासाठी एआय तंत्रज्ञान मार्गदर्शक ठरत आहे. मानवी बुद्धिमत्तेला मर्यादा आहेत, मात्र कृत्रिम बुद्धिमत्ता अमर्याद असून ती अचूक निर्णय प्रक्रियेत मोठी मदत करते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शेतीमधील उत्पादन कसे वाढवता येईल आणि जोखीम कशी कमी करता येईल, यासाठी शेतकऱ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करावा. असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. फाइंडॅबिलिटी सायन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद माहुरकर म्हणाले, मानवी बुद्धिमत्ता जे सांगू शकत नाही, ते एआय सांगू शकते. शेतीमध्ये विविध ऋतूंमध्ये काढलेली छायाचित्रे हा केवळ डेटा नसून, त्यापासून शिकणारी मशिन भविष्यातील संकटांचा अंदाज देऊ शकते. अन्नाची वाढती मागणी, हवामानातील अनिश्चितता आणि बाजारातील चढ-उतार यावर मात करण्यासाठी एआय माहितीचे अचूक विश्लेषण करते. यामुळे पिकांच्या आरोग्याशी संबंधित समस्या तात्काळ शोधणे शक्य होते. सध्याच्या काळात प्रत्येक गोष्टीतील बारकावे मानवी स्मरणात ठेवणे कठीण झाले असून, कृत्रिम बुद्धिमत्ता ही काळाची गरज बनली आहे. मात्र, आपल्याकडे 'चॅटजीपीटी'लाच एआय समजले जाते, ही चुकीची संकल्पना आहे. वास्तवत: एआय ही कोणतीही जादू नसून ती माहिती विश्लेषणाद्वारे अचूक निर्णय घेण्याचा एक सक्षम पर्याय आहे. तरी कृषी क्षेत्रातील क्रांतीसाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' प्रभावी शस्त्र आहे, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या कार्यशाळेतून कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. शेतकऱ्यांना आणि कृषी क्षेत्राशी संबंधित घटकांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शेतीमधील उत्पादन कसे वाढवता येईल आणि जोखीम कशी कमी करता येईल, यावर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मॅजिकचे व्यवस्थापक डी. एम. राठोड यांनी केले. या कार्यक्रमास कृषी उद्योजक, स्टार्टअप्स, संशोधक, तज्ज्ञ, शेतकरी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.




## महापौर-उपमहापौरांनी स्वीकारला पदभार

### शहरात ५ तास चालली मिरवणूक



जालना

जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांनी पदभार स्वीकारला. दरम्यान, शहरातील विविध भागातून पाच तास मिरवणूक काढून आणि दोन डीजे लावून फटाक्यांच्या आतषबाजीत नागरिकांनी नूतन महापौर, उपमहापौर यांचे जल्लोषात स्वागत केले. तसेच कार्यकर्त्यांनी मिरवणूक मार्गावर हायवाभर गुलाल उधळत जल्लोष केला. पदग्रहण कार्यक्रमाला माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आमदार कैलास गोरंट्याल, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, भास्कर दानवे, अशोक पांगारकर, महेश निकम, अक्षय गोरंट्याल, आयुक्त अशिमा मित्तल आदींची उपस्थिती होती. जालना महानगरपालिकेच्या महापौर, उपमहापौर यांच्यासह नगरसेवक भाजपच्या कार्यालयात एका बसमधून महानगरपालिकेत आले. बसमधून नगरसेवक उतरताच आतषबाजी, गुलाल उधळून त्यांचे स्वागत करण्यात आले. महापौर, उपमहापौर यांच्या स्वागतासाठी कार्यकर्त्यांनी हायवाने भरून गुलाल, दोन डीजे लावून फटाक्यांच्या आतषबाजीत जल्लोषात स्वागत केले आहे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी शहराचा दौरा करावा : वीज बिलाचा प्रश्न सोडवण्यासाठी सोलारचे काम सुरू आहे. पुढील काळात उत्तम काम करायचे आहे. जालना फर्स्ट हीच संकल्पना राबवणार असल्याचे दानवे म्हणाले. भाजप नेत्यांच्या उपस्थितीत जालना महापालिकेच्या महापौर,उपमहापौरांनी पदभार स्वीकारला. छाया । जावेद तांबोळी. ज्या नागरी समस्या सुटत नाहीत त्या समस्या आमच्याकडे आणाव्या. जालना महापालिकेचा वीज बिलाचा प्रश्न सोडवण्यासाठी सोलारचे काम सुरू आहे. येत्या काळात शहर उत्तम करायचे आहे, जालना फर्स्ट ही संकल्पना डोळ्यासमोर ठेवून काम करणार असल्याचे प्रतिपादन माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी केले. मान्यवर उपस्थित होते. पदभार स्वीकारण्याच्या कार्यक्रमावेळीच दोन वेळा वीजपुरवठा खंडित झाला होता. या वेळी अनेकांनी आपल्या मोबाइलच्या टॉर्च सुरू केल्या होत्या. दरम्यान, काही वेळानंतर जनरेटर सुरू करून वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. प्रशासकीय संस्थेतच वीज व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे यातून पुढे आले आहे. महापौरांनी मिरवणूक मार्गावरील सर्व मंदिरांमध्ये जाऊन दर्शन घेतले. महानगरपालिकेतून, गांधी चमन, शनी मंदिर, नूतन वसाहत अशा प्रकारे मिरवणुकीचा समारोप झाला.

## शेतकऱ्यांसाठी रामनगर कारखाना सुरू व्हावा:खा. डॉ.काळे

जालना : रामनगर साखर कारखाना सुरु करण्यात यावा, या मागणीसाठी कारभारी महाराज अंभोरे यांनी आमरण उपोषण सुरु केले आहे. सोमवारी त्यांच्या उपोषणाचा १४ वा दिवस होता. यावेळी जिल्ह्याचे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी उपोषणकर्ते अंभोरे महाराज यांची भेट घेतली. शेतकऱ्यांच्या हितासाठी हा कारखाना सुरु झाला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. याशिवाय त्यांनी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनाही या आंदोलनाची माहिती दिली.

## विद्यार्थ्यांनी आपली संस्कृती व संस्काराची जाणीव ठेवून मार्गक्रमण करावे- डॉ. सारिका क्षीरसागर

### वसंतदादा पाटील महाविद्यालयात स्नेह संमेलन संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

आजच्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा आधुनिक साधनामुळे विस्तारलेल्या आहेत. इंटरनेटमुळे माहिती व ज्ञानाच्या मर्यादेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आज आधुनिक तंत्रज्ञान व अद्यावत साधनांचा वापर करण्यात युवा पिढी अग्रेसर आहे. त्यामुळे जबाबदारी देखील वाढलेली आहे. विद्यार्थ्यांनी आपली संस्कृती व संस्काराची जाणीव ठेवून मार्गक्रमण करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ. सारिका क्षीरसागर यांनी केले.

नवगण शिक्षण संस्थेचे पाटोदा येथील वसंतदादा पाटील महाविद्यालयात दि ९ फेब्रुवारी रोजी स्नेह संमेलन व बक्षीस वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी उद्घाटक म्हणून नवगण संस्थेच्या संचालक डॉ. सारिका क्षीरसागर यांची तर अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. बळीराम राख, प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ह.भ.प रंधवे बापू, सोपानराव राख, संदीप जाधव, श्रीहरी गीते, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर संचालक डॉ. गणेश पाचकोरे, उपप्राचार्य प्रा.नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, कार्यालयीन अधीक्षक अशोक पवार, डी.फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.तांदळे, पब्लिक स्कूलचे नजीर पठाण, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. देवानंद पुरी आदीची उपस्थिती होती. महाविद्यालयात या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे प्रदर्शन केले. व शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये वर्षभरात विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या विद्यार्थी व प्राध्यापकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थितांना मार्गदर्शन करतांना डॉ.सारिका क्षीरसागर पुढे म्हणाल्या की, महाविद्यालय आपल्या प्रगती मध्ये वाढ करीत आहे ही समाधानाची बाब आहे. विद्यार्थी आपल्या शिक्षणा सोबतच महाविद्यालयाचे विविध उपक्रम एन.एस.एस, कला, क्रीडा, साहित्य,आविष्कार, विद्यापीठ महोत्सवात, सांस्कृतिक क्षेत्रात हिरीरीने सहभाग घेत आहेत. व विविध परीक्षेत यश मिळवीत आहेत. हे महाविद्यालयाचे यश आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनात अभ्यासा सोबतच विविध उपक्रमात सहभाग घेणे आवश्यक असते त्या मुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला दिशा मिळत असल्याचे प्रतिपादन डॉ. सारिका क्षीरसागर यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ह.भ.प रंधवे बापू यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बळीराम राख यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमाचा व शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.न.पु.काळे यांनी केले तर सूत्र संचालन डॉ. पांडुरंग सुतार व प्रा. कावेरी खुरणे यांनी केले व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. देवानंद पुरी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभागाचे प्रा. प्रदीप मांजरे, प्रा. कावेरी खुरणे, प्रा. नामदेव कळसकर, प्रा. अमोल भालेराव,विविध समित्यांचे प्रमुख व सदस्य, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.





### जाहिर नोटीस
### श्री.एन.एम.वाली, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धारुर यांचे न्यायालयात

**दिवाणी चौकशी अर्ज क्र.११/२०२६**
**निशाणी क्र..११/क**

१. सिद्धार्थ पि. श्रीहरी देशमाने वय ४८ वर्षे धंदा शेती रा चाटगाव ता धारूर जि बीड २. बाबासाहेब पि. श्रीहरी देशमाने वय ४५ वर्षे धंदा नौकरी रा चाटगाव ता धारूर जि २. बीड ३. शिला भ्र जगन्नाथ गडसिंग वय ४७ वर्षे धंदा घरकाम रा लउळ ता माजलगाव जि बीड

विरुध्द ) अर्जदार ) सामनेवाला कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहिरनामा/जाहिरनोटीस द्रवारे असे कळविण्यात येते की, ज्या पेक्षा मयत श्रीहरी पि संतोबा देशमाने रा चाटगाव ता.धारुर जि.बीड यांचे दिनांक २३/०९/२०२५ रोजी चाटगाव ता.धारुर जि. बीड येथे निधन झालेले आहे. त्यांना अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत.

मयत श्रीहरी पि संतोबा देशमाने यांचे पश्चात शासकिय/निमशासकिय व इतर कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदार हे मयत श्रीहरी पि संतोबा देशमाने यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन वारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे. न्यायालयात प्रत्यक्ष अथवा वकिलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्यो नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावा घेउन मे न्यायालयात अर्जेदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर 'आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज तारीख २८/०१/२०२६ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला.

प्रकरणात पुढील दिनांक : २०/०३/२०२६

स्वाक्षरित
क. लिपीक

हुकूमावरुन
स्वाक्षरित
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क. स्तर, धारुर



### जाहिर नोटीस
### श्री.एन.एम.वाली, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धारुर यांचे न्यायालयात

**दिवाणी चौकशी अर्ज क्र.१७/२०२६**
**निशाणी क्र.१३/क**

१. विजयमाला भ शामराव सोनवणे वय ७५ वर्षे धंदा घरकाम रा चौंडी ता धारूर जि बीड, २. तुकाराम पि शामराव सोनवणे वय ३५ वर्षे धंदा शेती रा चौंडी ता धारूर जि बीड, ३. महादेव पि शामराव सोनवणे वय ३२ वर्षे धंदा शेती रा चौंडी ता धारूर जि बीड, ४. शिवाजी पि शामराव सोनवणे वय २८ वर्षे धंदा शेती रा चौंडी ता धारूर जि बीड, ५. सोमनाथ पि शामराव सोनवणे वय २५ वर्षे धंदा शेती रा चौंडी ता धारूर जि बीड

विरुध्द ) अर्जदार ) सामनेवाला कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहिरनामा/जाहिरनोटीस द्रवारे असे कळविण्यात येते की,

ज्या पेक्षा मयत शामराव पि सखाराम सोनवणे रा चौंडी ता.धारुर जि. बीड यांचे दिनांक १५/०६/२०२५ रोजी चौंडी ता.धारुर जि.बीड येथे निधन झालेले आहे. त्यांना अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत.

मयत शामराव पि सखाराम सोनवणे यांचे पश्चात शासकिय / निमशासकिय व इतर कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदार हे मयत शामराव पि सखाराम सोनवणे यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन वारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे. न्यायालयात प्रत्यक्ष अथवा वकिलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावा घेउन मे. न्यायालयांत अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज तारीख २८/०१/२०२६ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला.

प्रकरणात पुढील दिनांक २७/०३/२०२६

स्वाक्षरित
क. लिपीक

हुकूमावरुन
स्वाक्षरित
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क. स्तर, धारुर


## सोलार पंप चोरीच्या खोट्या घटना वाढल्या ?

घनसावंगी । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील सोलार पॅनलवर चालणाऱ्या विहिरीतील मोटार चोरीला गेल्याची खोट्या घटनेमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येत आहे. मागील काही दिवसांपासून हे प्रकार वाढल्याने शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्र शासनाच्या पी.एम. कुसुम योजनेअंतर्गत सन २०२३ मध्ये सोलार पॅनलसह ७.५ एचपी क्षमतेची शक्ती कंपनीची योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना देण्यात येत आहे परंतु त्याचा घर वापर करून काही शेतकरी चोरीला गेल्याच्या खोटी माहिती देऊन पुन्हा दाखल करण्यात येत आहे तसेच पावसाळयामध्ये चक्रीवादळामुळे उडून गेल्याचे तसेच तुटल्याचे खोट्या घटनेची नोंद होत आहे याप्रकरणी सखोल चौकशी करूनच गुन्हा दाखल करण्यात यावे अशी मागणी होत आहे.


### मंठा कृषि उत्पन्न बाजार समिती, मंठा ता. मंठा जि. जालना

## जाहीर सुचना

मंठा कृषि उत्पन्न बाजार समिती तालुका मंठा कार्यक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी शेतमालाची खरेदी-विक्रीचा व्यवहार करणाऱ्या आडते, व्यापारी, खरेदीदार, दलाल, प्रक्रीयाकार, हमाल, मापाडी, स्वस्त धान्य दुकानदार, तेलबिया, उत्पादक, सह. संस्था, कांदा बी खरेदीदार, केळी खरेदीदार व आडते आणि इतर सर्व बाजार घटकांना या जाहीर सुचनेद्वारे सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनीमय) अधिनियम १९५३ व कृषि उत्पन्न बाजार-विक्री (विकास व नियमन) नियम १९६७ व सुधारीत १९९० चे कलम ६ (५-अ) नुसार अनुज्ञाप्तीच्या नुतनीकरणाकरीता करावयाचा अर्ज २८ फेब्रुवारी २०२६ पूर्वी केला गेला पाहीजे. जर अर्ज मुदतीत केला गेला नाही तर बाजार समितीस अनुज्ञाप्तीच्या फी च्या शेकडा १० टक्के (दहा) या प्रमाणे दर दिवसात होणाऱ्या विलंबा बद्दल लेट फी म्हणुन आकारण्याचा अधिकार आहे. तरी वरिल सर्व संबंधीत अनुज्ञाप्ती धारकांनी वर्ष २०२६-२७ या वर्षाकरीता २८ फेब्रुवारी २०२६ पुर्वी विहीत नमुन्यात अर्ज करून व्यवहारानुसार नियमाप्रमाणे फी भरून कागदपत्रांची पुर्तता करून घ्यावी. नसता २८ फेब्रुवारी २०२६ नंतर व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांना वरील प्रमाणे विलंबाबद्दल लेट फी म्हणून आकारण्यात येईल. तसेच अर्जासोबत गेल्या वर्षात केलेल्या व्यवहाराचा तपशिल जोडणे आवश्यक आहे.

दिनांक :- ३१/०३/२०२६ नंतर विनापरवाना व्यवहार करणाऱ्या विरूद्ध कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनीमय) अधिनियम १९६३ चे कायद्यान्वये कलम ४६ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**महत्वाची सुचना :-**

०१) नविन परवाना (लायसन्स) घेण्यासाठी व नुतनीकरणा करीता खालील कागदपत्राची पुर्तता करणे आवश्यक आहे. अ) विहीत नमुन्यातील अर्ज ब) पतदारीचे प्रमाणपत्र क) रोख किंवा त्रयस्थ इसमाचे हमीपत्र ड) सुरक्षा अनामत रक्कम किंवा बँक गॅरंटी. ०२) विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक माहिती सुट्टीचे दिवस वगळुन कार्यालयीन वेळेत कार्यालयात मिळतील. ०३) परवाना घेऊ इच्छिणाऱ्या इसमास आवश्यक मुद्रकांची (स्टॅम्पची) पुर्तता करावी लागेल. ०४) बाजार फी, भुखंड भाडे, गोदाम भाडे, तपासणी फी, इतर बाजार समितीची कोणत्याही प्रकारची थकबाकी असणाऱ्या व्यापाऱ्यांचे परवाने नुतनीकरण केले जाणार नाही.०५) भागीदारी असल्यास त्यांची नक्कल त्याची नक्कल दिल्याशिवाय भागीदारी ग्राह्य धरली जाणार नाही.०६) परवाना गहाळ अथवा खराब झालेला असल्यास १० रू. नक्कल फीस भरून नविन परवाना तयार करून मिळेल. ०७) परवान्यावर लावण्याकरीता परवाना धारकांनी ईच्छुकांनी आपले दोन (०२) पासपोर्ट साईजचे फोटो सोबत घेऊन यावे. दिनांक २८/०२/२०२६ नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

टिप :- ०१) २०२६-२७ चा नविन परवाना तथा नुतनीकरण करू इच्छिणाऱ्या सर्व संबंधीतांनी प्रत्यक्ष कार्यालयात येऊन रक्कमेसह सर्व कागदपत्राची पुर्तता करून घ्यावी. त्याशिवाय परवाना मिळणार नाही. ०२) ज्या व्यापाऱ्यांनी बाजार समितीकडुन लिज प्लॉट घेतलेले आहेत. त्या लिज प्लॉटची मुदत संपली असल्या कारणाने पुढील कार्यवाही करीता या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**श्री. रमेश सखाराम बोराडे**
**सचिव**

**श्री. गोपाळराव गोविंदराव बोराडे**
**उपसभापती**

**श्री. आसाराम जिजाभाऊ बोराडे**
**सभापती**



# समीर राजूरकर छत्रपती संभाजीनगरचे २३वे महापौर

### राजेंद्र जंजाळ उपमहापौरपदी, प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर शहराला मिळाले नेतृत्व

छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाची निवडणूक तब्बल दहा वर्षांनंतर मंगळवारी पार पडली. कोरोना महामारी आणि इतर कारणांमुळे लांबणीवर पडलेल्या निवडणुकांनंतर आज पार पडलेल्या महापौर-उपमहापौर निवडणुकीत महायुतीने आपले वर्चस्व सिद्ध केले. शहराचे २३ वे महापौर म्हणून भाजपचे समीर सुभाष राजूरकर तर उपमहापौर म्हणून शिवसेना शिंदे गटाचे राजेंद्र जंजाळ यांची बहुमताने निवड करण्यात आली. पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी या निवडीची अधिकृत घोषणा केली. मंगळवारी सकाळी ११ वाजता विशेष सभेला सुरुवात झाली. भाजपातर्फे महापौरपदासाठी समीर राजुरकर यांना उमेदवारी देण्यात आली तर त्यांच्या विरोधात एमआयएमतर्फे अशोक हिवराळे यांनी उमेदवारी अर्ज सादर केले. मंगळवारी दुपारी मनपा सभागृहात हात उंचावत घेतलेल्या मतदानार समीर राजुरकर यांना ७० तर अशोक हिवराळे यांना ३३ मते मिळाली. उपमहापौरपदाच्या निवडणुकीतही हाच कित्ता गिरवला गेला. शिवसेनेचे राजेंद्र जंजाळ यांनी ७० मते मिळवत एमआयएमचे उमेदवार मोहंमद वसीम अहेमद यांना पराभूत केले.

या निवडणुकीत एकूण ११५ नगरसेवकांपैकी १०३ सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला. उर्वरित १२ नगरसेवकांनी तटस्थ राहणे पसंत केले. शिवसेना ठाकरे गआचे ६, वंचित बहुजन आघाडी ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या एकमेव नगरसेवकाने कोणलाही मतदान केले नाही. तर काँग्रेसच्या नगरसेविका मलिका हबीब कुरेशी या महापौर आणि उपमहापौर पदाच्या मतदानावेळी गैरहजर राहिल्या. महापौरपदी निवड झाल्यावर समीर राजुरकर यांनी भाजपा नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. पक्षाने शहर विकासाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला, त्यानुसार आता काम करणार आहे. शहराच्या विकासासाठी काम करणार असून, सर्व समस्या सोडवणार असल्याचे आश्वासन असल्याचे समीर राजुरकर यांनी दिले.



कोरोना संकट आणि तांत्रिक कारणांमुळे महानगरपालिकेवर गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासकीय राजवट होती. तब्बल एक दशकानंतर लोकप्रतिनिधींची सत्ता पुन्हा पालिकेत स्थापन झाल्याने उत्साहाचे वातावरण आहे. शहराचे नाव औरंगाबादवरून 'छत्रपती संभाजीनगर' झाल्यानंतर पहिले महापौर होण्याचा मानही या निमित्ताने समीर राजूरकर यांच्याकडे गेला आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी विजयी उमेदवारांची घोषणा केल्यानंतर महायुतीच्या कार्यकर्त्यांनी महानगरपालिका परिसरात जल्लोष साजरा केला.

महापालिका निवडणुकीत भाजप आणि शिवसेना शिंदे गट हे दोन्ही पक्ष स्वबळावर लढले होते. यात भाजपने सर्वाधिक ५७ जागा जिंकल्या, तर शिवसेनेला १३ जागांवर यश मिळाले. ११५ सदस्यांच्या सभागृहात सत्तास्थापनेसाठी ५८ या 'मॅजिक फिगर'ची गरज होती. भाजपला स्वबळावर सत्ता स्थापन करण्यासाठी अवघ्या एका जागेची कमतरता होती. त्यामुळे भाजप कोणाची मदत घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर, केंद्रात आणि राज्यात असलेल्या 'महायुती'च्या फॉर्म्युल्यानुसार भाजपने आपल्या नैसर्गिक मित्रपक्षाला अर्थात शिवसेनेला सोबत घेत महापालिकेवर सत्ता स्थापन केली. दरम्यान, छत्रपती संभाजीनगरच्या महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडी झाल्यानंतर या निवडीनंतर शिंदेंच्या शिवसेनेच्या वतीने मोठा जल्लोष करण्यात आला. राजेंद्र जंजाळ यांची विजयी रॅली काढण्यात आली. मात्र, भाजपच्या वतीने समीर राजूरकर यांच्या निवडीनंतर कोणताही जल्लोष करण्यात आला नाही. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गत २८ जानेवारी रोजी विमान अपघातात निधन झाले. त्यामुळे भाजपने कोणताही जल्लोष साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे.

# वरिष्ठांचे आशीर्वाद! बांधकाम विभागाचा अभियंता झाला गुत्तेदार

## ना निविदा ना मंजुरी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय विश्रामगृहाचे नूतनीकरणाचे काम प्रगतीपथावर असून, या कामाचा गुत्तेदार स्वतः सार्वजनिक बांधकाम विभागाचा इंजिनिअर असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. कोणत्याही प्रकारची निविदा न काढता, कामाची मंजुरी न घेताच काम सुरू आहे. वरिष्ठांना मॅनेज करून दरवर्षी, थातूरमातूर काम करून, लाखोची बिले काढली जात असल्याने, या विभागाला भ्रष्टाचाराची कीड लागली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता चिरके यांच्या कारभाराची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी होऊ लागली आहे.गेवराई येथील नवीन विश्रामगृहाचे बांधकाम सुरू असून, जुने शासकीय विश्रामगृह मोडकळीस आलेले आहे. त्याची दुरुस्ती करण्यात येत आहे. सध्या, हे काम प्रगतीपथावर आहे. कामाच्या संदर्भात माहिती घेतली असता, जुने







शासकीय विश्रामगृह अद्ययावत करून, त्याचे सुशोभीकरण केले जात आहे. मात्र, सदरील काम वरिष्ठांकडून तोंडी आदेश घेऊन करण्यात येत असल्याची चर्चा आहे. स्वतःच उपविभागीय अभियंता चिरके यांनी सुरू केले आहे. नवले नावाचे इंजिनिअरिंग देखरेखीस ठेवले आहेत. विश्रामगृहाची तोडफोड करून, खिडक्या, फरशी, रंगरंगोटी करण्यात येत आहे. कामाची निविदा मंजूर करण्यात आलेली नाही. मा. न्यायाधीशांच्या सूचनेवरून, सदरील काम करण्यात येत असल्याची माहिती, येथील अभियंत्यांनी दिली आहे. या कामासाठी गेवराई सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता चिरके व शाखा अभियंता नवले यांनी खर्च केला आहे. त्यामुळे, गेवराई सार्वजनिक बांधकाम विभाग खाजगी मालमत्ता आहे का ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. दरम्यान, गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यावर खड्डे पडलेत. राज्य रस्त्यावर खड्डे झाले आहेत. त्याकडे, दूर्लक्ष करून, स्वतःची तुंबडी भरण्यात चिरके यांनी धन्यता मानली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर अधिकाऱ्यांचे लक्ष नाही. शासनाकडून दरवर्षी येणाऱ्या निधीवर डल्ला मारला जात आहे. या सगळ्या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी होऊ लागली आहे. चकलांबा – गेवराई– जातेगाव राज्य रस्त्याच्या कामात ही, चिरके आणि त्यांच्या चांडाळचौकडीने हात ओले करून घेतल्याची माहिती आहे.

# सांडसचिंचोली वाळू ठेक्यावर बेसुमार वाळू उपसा

## ठेकेदाराशी संगनमत, महसुल विभागातील हफ्तेखोरी वाढली– पोटभरेंचा गंभीर आरोप

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सांडसचिंचोली वाळू ठेक्यावर शासन नियमांची सर्रास पायमल्ली होत आहे. शासनाने घालून दिलेल्या अटीशर्ती धाब्यावर बसवून पोकलेनद्वारे व जेसीबीद्वारे सीसीटीव्हीच्या निगराणीशिवाय वाळू उपसा सुरू असून ओव्हरलोड वाहतुक केली जात आहे.यामुळे रस्ते मृत्यूच्या सापळ्यात बदलत आहेत. दरम्यान या सर्व प्रकाराकडे महसूल प्रशासन वाळु ठेकेदाराशी संगनमत करत हप्तेखोरीमुळे डोळेझाक करत असल्याचा आरोप बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी केला.



माजलगाव शहरातील एका हॉटेलमध्ये दि १० फेब्रुवारी मंगळवार रोजी दुपारी १२:०० वाजता आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.यावेळी पत्रकारांना माहिती देताना ते म्हणाले की,तालुक्यात जवळपास सहा ठिकाणी वाळू लिलाव सुरू होणार आहेत.हे लिलाव नामधारी कोणाच्या तरी नावावर असले तरी या पाठीमागे मोठी राजकीय लॉबी कार्यरत आहे.त्यामुळे याठिकाणी शासन नियमांची पायमल्ली होण्याची भीती आहे.आज घडीला तालुक्यात सांडस चिंचोली वाळू ठेका सुरू आहे.या ठेक्यावर मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू आहे. खुलेआम पोकलेन व जेसीबीचा वापर करून वाळू उपसा केला जात आहे. टेंडर सुरू करण्यापूर्वी या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे अपेक्षित आहे.परंतु शासन नियमांची पायमल्ली करत येथे बेसुमार ओव्हरलोड हायवाद्वारे वाहतूक केली जात आहे.गुंड लोकांना वाळू ठेक्यावर बसवुन रस्ते खराब होत असल्याची तक्रार करणाऱ्या गावातील सर्वसामान्य नागरिकांना दादागिरी सुरू आहे.त्यामुळे या ठेक्यावर सुरू असलेल्या

पान ३ वर

# केज विधानसभा शिवसेनेचा कार्यकर्ता मेळावा १३ फेब्रुवारीला

## मंत्री संजय शिरसाठ, संपर्कप्रमुख मनोज शिंदे, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन यांची प्रमुख उपस्थिती



बीड । प्रतिनिधी

केज विधानसभा मतदारसंघात आगामी राजकीय हालचालींच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने शक्तिप्रदर्शनाची तयारी सुरू केली असून, माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांच्या प्रवेशानंतर मोठे शक्ती प्रदर्शन करण्यासाठी शिवसेनेचा केज विधानसभा मेळावा शुक्रवार, १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता केज येथील मुक्ताई मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. शिवसेनेच्या उपनेत्या व माजी आमदार संगीता ताई ठोंबरे , जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक, अनिल दादा जगताप, स्वप्नील भैया गलधर यांच्या नेतृत्वाखाली मेळावा यशस्वी करण्यासाठी नियोजन सुरू आहे.

संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणि आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची स्पष्ट भूमिका मांडण्यासाठी हा मेळावा महत्त्वाचा मानला जात आहे. या मेळाव्यास सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ साहेब आणि संपर्कप्रमुख मनोज शिंदे साहेब, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन उपस्थित राहून शिवसैनिकांना मार्गदर्शन करणार आहेत.

केज विधानसभा मतदारसंघात शिवसेनेची ताकद पुन्हा एकदा एकत्र आणण्यासाठी माजी आमदार सौ संगीता ताई ठोंबरे व शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी आखलेली ही रणनिती आगामी राजकारणाच्या दृष्टीने निर्णायक ठरणार आहे. केज विधानसभा मतदारसंघातील सर्व राजकीय गणिते बदलणार असल्याचे संकेत माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांनी दिले आहेत. मेळाव्यास केज विधानसभा मतदारसंघातील सर्व शिवसेना पदाधिकारी , आजी माझी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पक्षाची ताकद दाखवावी, असे आवाहन केज तालुकाप्रमुख अण्णासाहेब पाटील, आंबेजोगाई तालुकाप्रमुख अर्जुन वाघमारे, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने, महिला जिल्हाप्रमुख चंद्रकलाताई बांगर, युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे, बांधकाम कामगार जिल्हाप्रमुख रवी मुडेगावकर ,आंबेजोगाई शहर प्रमुख गणेश जाधव, शहर प्रमुख बालासाहेब पवार, युवा सेना तालुकाप्रमुख दत्तप्रसाद काकडे, युवा सेना शहर प्रमुख आकाश चाळक, केज महिला तालुकाप्रमुख जयताई राऊत, आंबेजोगाई तालुकाप्रमुख सुनीताताई जाधव ,केज शहर प्रमुख वैशालीताई सांगळे, आंबेजोगाई शहर प्रमुख तनुजाताई मुंडे उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे ,कैलास उगलमुगले ,डॉक्टर संतोष बुडुक, विकास काशीद, सुनील पटाईत, दादासाहेब पटाईत ,सरपंच अजित गोरे, युवा सेना विधानसभा प्रमुख अभिजीत घाटूळ, शिवाजी गायकवाड यांनी केले आहे.

# आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त पत्रकारांसाठी दोन कोटींचा अपघात विमा

## ॲड.प्रकाश कवठेकर यांचा स्तुत्य उपक्रम

पाटोदा । प्रतिनिधी

मराठवाडा भुषण आमदार सुरेश धस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ॲड प्रकाश कवठेकर यांनी पाटोदा तालुक्यातील पत्रकारांसाठी दोन कोटी रुपयांचा अपघात विमा काढून सामाजिक बांधिलकी जपली आहे. पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी तसेच अपघाती प्रसंगी त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

पत्रकार हे समाजाचे आरसे असून बातमी संकलनाच्या कामात त्यांना अनेक वेळा धोकादायक परिस्थितीला सामोरे जावे लागते.



अशा वेळी अपघात झाल्यास आर्थिक मदत मिळणे गरजेचे असते. ही बाब लक्षात घेऊन ॲड प्रकाश कवठेकर यांनी स्वतः पुढाकार घेत पाटोदा तालुक्यातील पत्रकारांसाठी प्रत्येकी चार लाख रू प्रमाणे दोन कोटींचा अपघात विमा काढण्याचा निर्णय घेतला.

या उपक्रमाबद्दल पाटोदा तालुक्यातील पत्रकारांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून, पत्रकार संघटनांनी या पान ३ वर

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये बारावी बोर्डाची परीक्षा सुरळीत सुरू

धारूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणारी बारावीची परीक्षा राजमाता जिजाऊ महाविद्यालय, किल्ले धारूर येथील परीक्षा केंद्रावर अत्यंत सुरळीत आणि शांततामय वातावरणात पार पडत आहे. शिस्तबद्ध नियोजन, परीक्षा केंद्रावर कॉपीमुक्त अभियान राबवण्यात येत असून केंद्रावर कडक शिस्त पाळली जात आहे. परीक्षेसाठी बैठे पथक म्हणून श्री. आडसकर बी. बी, श्री. मुंडे एल. एम., श्री. राठोड पी. आर. हे कार्य करत आहेत. या परीक्षा केंद्राचे कामकाज केंद्रप्रमुख बाळासाहेब चवार आणि सहकेंद्रप्रमुख देशमुख पी. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत पारदर्शकपणे परीक्षा सुरू आहे. सदर केंद्रावर एकूण ४२४ विद्यार्थ्यांची नोंदणी असून, त्यापैकी ४१० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांची तपासणी करूनच त्यांना प्रवेश दिला जात आहे. केंद्रप्रमुख बाळासाहेब चवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांनी कोणत्याही दडपणाखाली न येता परीक्षा द्यावी यासाठी केंद्रावर पोषक वातावरण निर्माण करण्यात आले आहे. तसेच सर्व पर्यवेक्षक आणि कर्मचारी परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विशेष परिश्रम घेत आहेत. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य डॉ. मिलिंद गायकवाड यांनी सर्व परीक्षार्थींना परीक्षा देण्यासाठी सदिच्छा दिल्या.

# मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी सोहळ्याच्या तयारीचा आढावा आमदार सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वनियोजन बैठक

आष्टी । प्रतिनिधी

सावरगाव मायंबा येथील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर दरवर्षीप्रमाणे यंदाही मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी सोहळा १८ मार्च रोजी मोठ्या भक्तिभावात साजरा होणार आहे. गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला वर्षातून एकदाच ही संजीवन समाधी भाविकांच्या दर्शनासाठी खुली केली जाते. या पवित्र सोहळ्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो नाथभक्त उपस्थित राहत असतात.

या पार्श्वभूमीवर उत्सवाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी सोमवारी देवस्थानचे विश्वस्त तथा



आमदार सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वनियोजन बैठक पार पडली. या बैठकीस पोलीस, महसूल, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, वीज वितरण, पाणीपुरवठा तसेच इतर सर्व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत भाविकांच्या सोयीसुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये दर्शन रांग व्यवस्था, व्हीआयपी दर्शन व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, पान ३ वर

# जलजीवन मिशन, रेल्वेसाठी निधी अन् स्वारातीसाठी कर्मचारी द्या –खा.सोनवणे



बीड । प्रतिनिधी

हर घर जल, म्हणत जलजीवन मिशन योजनेचा मोठा गाजावाजा केला जातो, एकीकडे या योजनेचा निधी लॅप्स होतो, तर दुसरीकडे माझ्या जल्ह्यिात कामे पुर्ण करण्यासाठी निधी दिला जात नाही. धाराशिव–बीड–छत्रपती संभाजीनगर रेल्वे होणे आवश्यक असून त्यासाठी निधी द्यावा, याच बरोबर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तर्थि वैद्यकिय रूग्णालयासाठी कर्मचाऱ्यात वाढ करावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत केली.

सन २०२६–२०२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर लोकसभेत चर्चा करताना बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली. सदर अर्थसंकल्पात कोणताही स्पष्ट दृष्टीकोन, ठोस धोरण अथवा देशवासीयांसाठी काहीतरी करण्याची इच्छाशक्ती दिसून येत नसल्याचा आरोप त्यांनी केला. हा अर्थसंकल्प घाईघाईत, जमिनीवरील वास्तव न समजून तयार करण्यात आल्याचे सांगत त्यांनी याला जुमला बजेट असे संबोधले.खा.सोनवणे म्हणाले, मागील अर्थसंकल्पातीलच मुद्दे यावेळी केवळ रंगरंगोटी करून पुन्हा मांडण्यात आले आहेत. अर्थमंत्र्यांनी पान ३ वर

### उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर

एमएसएमई क्षेत्राबाबत सरकार केवळ आश्वासने देत असल्याची टीका करत सोनवणे म्हणाले की, लघु व मध्यम उद्योग आज बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. उत्पादन क्षमता असूनही बाजारव्यवस्थेसाठी ठोस धोरण नसल्याने भारत केवळ उपभोक्ता देश बनत चालला असून, याचा फायदा परदेशी कंपन्या घेत आहेत, असेही खा.सोनवणे म्हणाले.

# वंजारवाडी तलाव दुरुस्तीस आ.मुंडेंमुळे मान्यता



## शेतकऱ्यांचा सिंचन प्रश्न अखेर कायमस्वरूपी मार्गी; पाठपुरावा आम्ही केला, इतरानी आयत्या पीठावर रेघोट्या मारू नयेत: केशव तांदळे

**बीड । प्रतिनिधी**

नवगण राजुरी सर्कलमधील वंजारवाडी येथील लघु सिंचन प्रकल्पाच्या विशेष दुरुस्ती व सुधारणा कामांसाठी १ कोटी ७ लाख ४५ हजार ६०० रुपये इतक्या रकमेची प्रशासकीय मंजुरी मिळाली असून, त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. दरम्यान या प्रकल्पासाठी आम्ही पाच वर्ष पाठपुरावा केला असून आता आयत्या पिठावर कोणीही रेघोट्या मारू नयेत, असे पत्रक केशव तांदळे यांनी काढले आहे.

या प्रकल्पांतर्गत सांडव्याच्या तुटफुट झालेल्या भागास संधानकीय भिंत बांधणे, गळती होणाऱ्या ठिकाणी जॅकेटींग करणे, सांडव्याखाली ग्राऊटिंग, पाणीपातळी दर्शक पट्टी बसविणे, मुख्य कालव्याची दुरुस्ती, पाणी वापर संस्था स्थापन करणे आदी महत्त्वाची कामे प्रस्तावित आहेत. या कामांमुळे धरणाची सुरक्षितता वाढणार असून कालव्यातील गळती थांबून पाण्याचा प्रभावी वापर सिंचनासाठी होणार आहे.

वंजारवाडी लघु प्रकल्प सन १९६५ मध्ये पूर्ण झाला असून त्याची एकूण साठवण क्षमता २.८९३ दलघमी व जिवंत साठवण क्षमता २.६४१ दलघमी आहे. धरणाची लांबी ५४१ मीटर असून प्रकल्पास एक मुख्य कालवा आहे. मागील पाच वर्षांत या प्रकल्पातून केवळ १३९ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले होते. सांडव्याची कामे कमकुवत झाल्याने मोठ्या प्रमाणावर गळती होत असल्याचे निदर्शनास आले होते.

दि. २८ डिसेंबर २०२२ रोजी अधीक्षक अभियंत्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणी करून दुरुस्तीची आवश्यकता स्पष्ट केली होती. त्यानंतर महामंडळ स्तरावरील त्रयस्थ छाननी समितीमार्फत दि. ३ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रस्तावाची सखोल छाननी करण्यात आली. शासन निर्णयांनुसार सदर कामाचा समावेश नियामक मंडळाच्या आगामी ८२ व्या बैठकीतील प्राधान्यक्रमात करण्यात आला आहे. या यशामागे कृषिमंत्री मा. धनंजयजी मुंडे, मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस, तसेच बीडचे तत्कालीन पालकमंत्री व उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या प्रयत्नांचा मोठा वाटा असल्याचे मत पान ३ वर

# इस्त्रोच्या शैक्षणिक दौऱ्यासाठी रामनगर आश्रम शाळेतील दोन विद्यार्थ्यांची निवड



**माजलगांव । प्रतिनिधी**

**माध्यमिक आश्रम शाळा, रामनगर येथील इयत्ता ९ वीमध्ये शिक्षण घेत असलेल्या दोन विद्यार्थ्यांची भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) शैक्षणिक दौऱ्यासाठी निवड झाल्याने शाळा व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत घेण्यात आलेल्या विशेष निवड परीक्षेत शाळेतील चव्हाण युवराज रामेश्वरव कु. इंगळे धनश्री दत्ता या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून इस्त्रोच्या शैक्षणिक भेटीसाठी पात्रता मिळवली आहे. या यशामुळे विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत असून इतर विद्यार्थ्यांसाठीही हा प्रेरणादायी ठरला आहे.या निवडीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा शाळेत सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी क्षीरसागर,वडवले, बारगजे,संस्थेचे अध्यक्ष अविनाश पवार, डॉ.आशिष पवार यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या शाळेचे मुख्याध्यापक श्री मठपती सर, विज्ञान शिक्षक श्री कांबळे सर, जमजाळ सर, मादरपल्ले सर, देशमुख सर, सयद सर, पुलकुंडवार सर, देशमुख सर, पडलवार मॅडम, राठोड सर, रोकडे सर, पठाण एस केशिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच छोटीवाडी व रामनगर येथील ग्रामस्थांनीही विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या यशाचा गौरव केला. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या पाठबळामुळे हे यश मिळाल्याची भावना व्यक्त केली.विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे माध्यमिक आश्रम शाळा रामनगरच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणखी अधोरेखित करणारी ही अभिमानास्पद कामगिरी ठरली आहे.

# मार्केट कमिटीतील खरेदी-विक्री परवान्यांचे नूतनीकरण स्थगित करा- कुलदीप करपे

## सुमारे ५ लाख क्विंटल शेतमालाची एक हजार ते अडिच हजार रुपये कमी दरात खरेदी!

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या २०२५च्या खरीप ,रब्बी हंगामातील सोयाबीन, कापूस, तूर,उडीद, मूग ,बाजरी ,गहु ,ज्वारी आदी प्रकारच्या सुमारे ५लाख क्विंटल शेतमालाची १०००/–ते २५०० /–रु कमी दरात खरेदी बीड जिल्ह्यातील सर्वच कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या आवारात करण्यात आली असुन क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे ,शेकाप चे जिल्हा संघटक धनंजय मूळे,शेतकरी नेते राजेंद्र वीर ,क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड शहराध्यक्ष श्रीकृष्ण कोलंगडे ,महिला आघाडीच्या नयना भाकरे यांनी सदर नुकसानभरपाई देण्यासाठी जबाबदारी निश्चित करावी तसेच कमी दर देणाऱ्या मार्केट कमिटी च्या अंतर्गत शेतमाल खरेदी –विक्री परवान्यांचे नूतनीकरण स्थगित करण्याची मागणी



जिल्हाधिकारी ,जिल्हा उपनिंबधक ,जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मंगळवार दि.१०फेब्रुवारी २०२६ रोजी केली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की जिल्हा उपनिबंधक ,मार्केटिंग कमिटीचे सचिव ,कृषि पणन मंडळाचे जिल्हा मार्केटिंग अधिकारी , शेतकरी संघटना प्रतिनिधी यांच्यात दि.१९नोव्हेंबर २०२५ रोजी संयुक्त आढावा बैठक घेण्यात आली होती .बैठकीत कलम ३२ (ड )प्रमाणे किमान आधारभूत किंमत न देणाऱ्या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या यार्डातील खरेदीदाराविरुद्ध कार्यवाही करण्याचे ठराव मंजूर केले होते. मात्र मार्केट कमिटीच्या सचिवांनी जाणीवपूर्वक कोणावरही कार्यवाही केली नाही .आढावा बैठकीत जिल्ह्यातील मार्केट कमिटींच्या सचिवांनी सोयाबीन ,कापूस ,तूर, बाजरी ,ज्वारी, गहू आदी प्रकारचा सुमारे ५ लक्ष क्विंटल शेतमाल बाजार समिती आवारात लिलावाद्वारे खरेदी करण्यात आला असून त्याची मार्केट फिस वसुल केल्याचे मान्य केले आहे.ज्या शेतमालाची मार्केट फीस वसूल केली जाते त्या शेतमालाला केंद्र शासनाकडून निर्धारित केलेले किमान आधारभूत दर देणे क्रमप्राप्त आहे .सुमारे ५लाख प्रतिक्विंटल पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार दि.११ फेब्रुवारी २०२६ । पान ७

# स्पा माफियाच्या मुसक्या आवळल्या!
## देहविक्री रॅकेटचा मास्टरमाइंड अखेर जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात मसाज सेंटरच्या आडून वेश्या व्यवसायाचे जाळे उभारणाऱ्या कथित मुख्य सूत्रधारावर अखेर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. धनराज शामराव जाधव या रेकॉर्डवरील गुन्हेगाराला एमपीडीए कायद्यानुसार एक वर्षासाठी नागपूर मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

पुणे शहरात स्पा आणि मसाज सेंटरच्या नावाखाली देहविक्रीचे रॅकेट चालविणाऱ्या दलालांविरोधात पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी कठोर भूमिका घेतली असून, त्याच पार्श्वभूमीवर धनराज जाधव याच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांच्या नोंदीनुसार धनराजवर अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यानुसार पुणे शहर, छत्रपती संभाजीनगर आणि ठाणे शहरातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल आहेत. धनराज हा शहरातील विविध मसाज सेंटरच्या आडून तरुणींना आर्थिक प्रलोभने






देत त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचा आरोप आहे.

त्याच्याविरोधात यापूर्वी गुन्हे दाखल होऊनही त्याच्या वर्तनात सुधारणा झाली नसल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. त्यामुळे त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करणे आवश्यक होते असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नमूद केले. त्याच्यावर १४ जानेवारी २०२५ रोजी त्याच्यावर स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्याची चाहूल लागताच तो फरार झाला होता. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून वानवडी येथून दि. ७ रोजी त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याची रवानगी थेट नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली. पुण्यासह संभाजीनगर, ठाणे, नवी मुंबई, पिंपरी-चिंचवड आणि मुंबई या शहरात त्याचे जाळे पसरलेले असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्याच्या स्पा सेंटरवर यापूर्वी अनेकदा कारवाया झाल्या होत्या. तरीही तो शहराबाहेरून हे रॅकेट चालवत असल्याचे तपासात समोर आले. वानवडी पोलिस ठाण्यात त्याच्या स्पा सेंटरमधील कथित देहविक्रीप्रकरणी २०२४ मध्ये गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षकांनी स्थानबद्धतेचा प्रस्ताव सादर केला होता.

स्पा माफियांना थेट इशारा

स्पा आणि मसाज सेंटरच्या आडून सुरू असलेल्या गैरप्रकारांबाबत पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सुरुवातीपासूनच कडक धोरण अवलंबले आहे. स्थानिक पोलिस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना अशा प्रकरणांवर सतत कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या भूमिकेमुळे अनेक स्पा व्यावसायिकांनी शहरातून व्यवसायाचा गाशा गुंडाळला आहे. धनराज जाधववरील स्थानबद्धतेची कारवाई ही त्याच मालिकेतील मोठी कारवाई मानली जात आहे.

# आनंद जोगळेकरांच्या संत वाङ्मयाचे विचारधन ग्रंथाचे थाटात प्रकाशन

**पुणे । प्रतिनिधी**

संत श्री रामदास स्वामी आणि माऊली ज्ञानेश्वर यांच्या वाङ्मयातील विचारधन मानवी जीवनाला प्रेरक असून यशस्वीतेकडे नेणारे आहे असे मत शिवथरघळ येथील श्री सुंदरमठ सेवा समितीचे विश्वस्त डॉ. विजय लाड यांनी पुण्यातील रावेत किवळे येथील ग्रंथ प्रकाशन सोहळ्यात व्यक्त केले.

समर्थ रामदास स्वामींच्या पुण्यतिथी पर्वकाळात आयोजित रामदास स्वामी स्थापित महाबळेश्वर मठातील समर्थांच्या चरण पादुका , कुबडी आणि त्यांनी वापरलेला तुंबा या दुर्मिळ वस्तूंचा पूजन आणि दर्शन असा सोहळा पुण्यात आयोजित करण्यात आला होता. पहाटे काकड आरतीपासून अभिषेक, भजन , कीर्तन, तसेच विनीत जोशी यांचे प्रवचन दासबोध सखोल अभ्यास फाउंडेशन परिवारातर्फे आयोजित करण्यात आले होते . संत श्रेष्ठ माऊली ज्ञानेश्वर यांच्या ग्रंथराज ज्ञानेश्वरीतील आणि समर्थ रामदास स्वामींच्या वाङ्मयातील निवडक ओव्यांवरील निरूपण म्हणजे समर्थ संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय यामध्ये साधलेला सुमधुर समन्वय या



ग्रंथातून मांडला आहे असे विचार तळेगाव येथील विनीत जोशी यांनी व्यक्त केले. रात्री शेजारती पर्यंत समर्थांच्या चरणपादुकांचे दर्शन घेण्यासाठी भाविक भक्तांची रांग लागली होती . आनंद जोगळेकर लिखित दुसरा ग्रंथ श्री समर्थ रामदास स्वामी आणि संत ज्ञानेश्वर यांचे विचारधन या पुस्तकाचे प्रकाशन झाल्यानंतर आरती आणि खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दासबोध सखोल अभ्यास उपक्रमाचे पदाधिकारी, महाबळेश्वर मठाचे मठपती दिवाकर गोसावी देशपांडे तसेच के विले सोसायटीतील सर्व नागरिकांनी परिश्रम घेतले

# पुणे पोलिसांचा ट्रिपल सीटस्वारांना दणका! लाखो रुपयांचा दंड वसूल



**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील वाढत्या वाहतूक नियमभंगावर लगाम घालण्यासाठी पुणे शहर वाहतूक पोलिसांनी ट्रिपल सीट दुचाकींविरोधात विशेष मोहीम हाती घेत मोठी कारवाई केली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार तसेच सह पोलीस आयुक्त आणि अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि वाहतूक दाटीच्या भागांमध्ये एकाच वेळी कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान तब्बल १,४५४ ट्रिपल सीट वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्यापैकी २,१४४ चलन तात्काळ पेड करून घेण्यात आली असून, त्यातून १६,१८,४०० इतकी रक्कम शासनाकडे जमा करण्यात आली आहे. याशिवाय विविध नियमभंगांबाबत एकूण ५,९२१ चलनांची कारवाई करण्यात आली.

# ७३ तोळे सोने अन् लाखोंची फसवणूक; निलंबित हवालदाराला बेड्या

**पुणे । प्रतिनिधी**

आर्थिक फसवणुकीच्या विविध गुन्ह्यांमध्ये नाव समोर आल्यानंतर फरार झालेल्या निलंबित पोलिस हवालदाराला भारती विद्यापीठ पोलिसांनी आंध्रप्रदेशातून ताब्यात घेतले आहे. गणेश अशोक जगताप (वय ५२, रा. कावेरीनगर पोलीस वसाहत, वाकड, पुणे) असे अटक करण्यात आलेल्या हवालदाराचे नाव आहे.



जगताप याच्याविरुद्ध भारती विद्यापीठ, चतुःश्रृंगी आणि कोथरूड पोलिस ठाण्यांत आर्थिक फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत. रविवारी (दि. ८) दुपारी त्याला आंध्रप्रदेशातून ताब्यात घेण्यात आले. सोमवारी न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला ११ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. सध्या तो पोलिस खात्यातून निलंबित आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका पार्लर व्यवसायिक महिलेला घरातील आजारपण व मुलीच्या शिक्षणाचा बहाणा सांगत अडीच लाखांहून अधिक रोकड आणि सुमारे सहा तोळे सोन्याचे दागिने घेऊन फसवणूक केल्याचा आरोप आहे.

या तक्रारीनुसार भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, यापूर्वी कोथरूड पोलिस ठाण्यात एका महिलेची ७३ तोळे सोने व १७ लाख रुपये रोख रकमेची फसवणूक केल्याचा गुन्हा जुलै महिन्यात नोंदविण्यात आला होता.

दरम्यान, २१ ऑगस्ट २०२४ रोजी जगताप याची पोलिस मुख्यालयातून विशेष शाखेत बदली झाली होती. मात्र तो हजर न राहता फरार झाला. या काळात औंध येथील एका सराफ व्यावसायिकाकडून पोलिस दलातील माजी वरिष्ठ अधिकाऱ्याचे नाव वापरून ८ लाख २२ हजार रुपयांचे दागिने घेतल्याचाही आरोप आहे.

या प्रकरणानंतर त्याचे निलंबन करण्यात आले होते. फरारी काळात तो शहराबाहेर लपून राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. दोन दिवसांपूर्वी तो आंध्रप्रदेशातील कडप्पा जिल्ह्यातील फुलपथरू गावात वास्तव्यास असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर पथक रवाना करण्यात आले. पोलिस उपायुक्त मिलिंद मोहिते, वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुल खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक स्नेहल थोरात व पोलिस अंमलदार मंगेश गायकवाड यांच्या पथकाने स्थानिक माहितीच्या आधारे त्याला ताब्यात घेतले. तो तेथे भाड्याच्या घरात राहत होता. यापूर्वीही जगताप याच्यावर राष्ट्रपती पदकासाठी खोटी कागदपत्रे सादर केल्याचा आरोप झाला होता. २०२१ मध्ये सरकारची फसवणूक केल्याप्रकरणी त्याच्यासह दोन लिपिकांवर वानवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# नगर रोडवर भीषण अपघात! भरधाव ट्रॅक्टरच्या धडकेत २४ वर्षीय तरुणाचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

नगर रस्त्यावर वडगाव शेरीत ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीवरील सहप्रवासी तरुणाचा मृत्यू झाला. हरिबा बन्सीलाल भालेराव ( २४, रा. एसआरए वसाहत, विमाननगर) याचा अपघातात मृत्यू झाला.




याबाबत प्रवीण गोकुळ नाईक ( २९, रा. छत्रपती संभाजी चौक, भाजी मंडईजवळ, चंदननगर) याने विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दुचाकीस्वार प्रवीण आणि त्याचा मित्र हरिबा हे रविवारी (८ फेब्रुवारी) दुपारी नगर रस्त्यावरुन निघाले होते.

वडगाव शेरीमध्ये सिग्नलपासून काही अंतरावर पाठीमागून आलेल्या भरधाव ट्रॅक्टरने पाठीमागून धडक दिली. दुचाकीवरील हरिबा चाकाखाली सापडल्याने गंभीर जखमी झाला. दुचाकीस्वार प्रवीण फेकला गेला. गंभीर जखमी झालेल्या हरिबा याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर पोलिसांनी ट्रॅक्टरचालक व्यंकटेश लोकेश राठोड ( २८, रा. वडगाव शिंदे, लोहगाव रस्ता) याला ताब्यात घेतले असून, त्याला नोटीस बजाविण्यात आली आहे. पोलीस उपनिरीक्षक क्षीरसागर तपास करत आहेत.

# पासपोर्टसाठी एआय चा वापर करुन चुकीची माहिती दिल्यास गुन्हा दाखल होणार

**पुणे । प्रतिनिधी**

विदेशात जाण्यासाठी काहीजण खरी माहिती लपवून 'एआय' चा वापर करुन खोटी कागदपत्रे पारपत्र (पासपोर्ट) कार्यालयाला देत आहेत.त्यामुळे यापुढे खोटी माहिती देऊन पासपोर्ट काढण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर आता फौजदारी गुन्हे दाखल होतील.अशी माहिती विभागीय पारपत्र अधिकारी डॉ.विनोद गायकवाड यांनी दिली.




पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने विभागीय पारपत्र अधिकारी डॉ.विनोद गायकवाड यांच्या वार्तालापाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी उपविभागीय पारपत्र अधिकारी श्रृती पांडे,पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील,सरचिटणीस मंगेश फल्ले,पारपत्र कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी जतीन पोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉक्टर गायकवाड म्हणाले, आता पारपत्र कार्यालयाचे कामकाज पूर्णपणे डिजिटल झाले आहे.त्यामुळे ते सर्व ऑलनाईन होते.अपाँन्टमेट पासून पासपोर्ट मिळेपर्यंत सर्वकाही वेगाने होत आहे. फक्त सरकारने सांगितलेली कागदपत्रे गोळा करुन मग अर्ज भरला तर काम सहज,सोपे अन वेगाने होते. पुण्यात दरमहा सुमारे ४ हजार अर्ज येतात.बाणेर कार्यलयातून १२ जिल्ह्यांचे काम चालते.एकुण १९ ऑफीस आहेत.१७ पोस्ट ऑफीसच्या माध्यमातूनही काम चालते. एजंटकडे जाण्याची गरज नाही.ऑनलाईन अर्ज करा. मेल पाठवला तर त्यावर किमान बारा तासांत उत्तर दिले जाते.इतके पारदर्शक काम आता होत आहे. अर्जदार नेमके उलटे करतात.आधी अर्ज करुन मग कागदपत्रांसाठी धावाधाव करतात.म्हणून पासपोर्ट मिळण्यात अडचणी निर्माण होतात. खरे तर ३० दिवसांत पासपोर्ट घरपोच देण्याचे आमचे लक्ष आहे.काही जणांना तसा अनुभव आहे.मात्र बहुतांश अर्जदार कागपत्रे नीट देत नाहीत.त्यामुळे वेळ लागतो, असे गायकवाड म्हणाले.

# पोलिस भरती साहित्य खरेदी प्रक्रियेत गैरप्रकाराचा आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे ग्रामीण पोलिस भरती प्रक्रियेसाठी सुरू असलेल्या खरेदी प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप बहुजन मुक्ती पार्टीने केला आहे. शासनाच्या नियमांनुसार साहित्य खरेदी प्रक्रिया ऋष्ठाच् (ऋीेंशीपाशपीं श-चरीज्ञशींश्रिरलश) या अधिकृत पोर्टलवरून करणे बंधनकारक असताना संबंधित विभागाने ही प्रक्रिया वेगळ्या पद्धतीने राबविल्याचा दावा करण्यात आला आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष दासराम नायक, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रतापदादा पाटील, तसेच पुणे शहराध्यक्ष बजरंग राजगुरू यांच्या वतीने पुणे ग्रामीण पोलिस अधिक्षकांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, काही साहित्यांच्या दरपत्रकासाठी केवळ एक दिवसाची मुदत देण्यात




आली. शासन नियमांनुसार अशी मुदत किमान ७ दिवसांची असणे आवश्यक असल्याचे पक्षाचे म्हणणे आहे. कमी मुदत देणे ही जाणीवपूर्वक केलेली बाब असून त्यामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरपत्रक मागविण्याची पद्धत आणि अल्प मुदत यामुळे काही निवडक पुरवठादारांना लाभ देण्याचा प्रयत्न असू शकतो, असा संशय व्यक्त करण्यात आला आहे. ही प्रक्रिया जाणूनबुजून चुकीच्या पद्धतीने राबवली जात असून यामध्ये भ्रष्टाचाराची शक्यता आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

# आयआयटीएम पुणे-इटली करार: एआयच्या साहाय्याने हवामान अंदाज अधिक अचूक

**पुणे । प्रतिनिधी**

हवामानातील बदलांसह महासागराकडून येणाऱ्या वादळांची वर्दी आता 'एआय'च्या साहाय्याने हवामान विभाग देणार आहे. हे अंदाज अचूक अन् वेगवान मिळावेत, यासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजी (आयआयटीएम) पुणे या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या संस्थेने इटली या देशासोबत नुकताच सामंजस्य करार केला आहे.

हवामान संशोधनात अग्रागण्य समजली जाणारी इटली देशातील सीएमसीसी (युरो-मेडिटेरियन सेंटर ऑन क्लायमेट चेंज) आणि आयआयटीएम पुणे या दोन संस्थांत हा करार २६ जानेवारी २०२६ रोजी झाला. एआय वापरून हवामान मॉडेलिंगला




चालना देण्यासाठी दोन देशांत संशोधनात्मक कार्याला गती यावी, हा सामंजस्य कराराचा (एमओयू) उद्देश असल्याचे आयआयटीएमच्या शास्त्रज्ञांनी सांगितले. या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यापूर्वी अनेक बैठका झाल्या. यात २६ जानेवारी २०२६ रोजीच्या बैठकीला सीएमसीसीचे अध्यक्ष अँटोनियो नवरा, आयआयटीएम पुणेचे संचालक डॉ. सूर्यचंद्र राव, शास्त्रज्ञ डॉ. स्वप्ना पानिकल, डॉ. सुवर्णा फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. हा सामंजस्य करार दोन्ही देशांच्या संशोधन संस्थांमध्ये देवाणघेवाण आणि संवादासाठीच्या उपक्रमांचा समावेश असलेल्या भागीदारीला औपचारिक स्वरूप देण्यासाठी करण्यात आल्याचे शास्त्रज्ञांनी सांगितले. या करारामुळे अचूक अन् वेगवान पद्धतीने हवामानासाठी अंदाज वर्तविण्याची क्षमता वाढेल. नावीन्यपूर्ण दृष्टिकोन विकसित होतील. करार भविष्यातील इटली-भारत सहकार्यासाठी मार्ग मोकळा करेल. संयुक्त कार्यगट स्थापन करणे आणि हवामान विज्ञानात एमएलच्या भूमिकेवर श्वेतपत्रिका तयार करणे यांचा समावेश आहे. एआय वापरून हवामान मॉडेलिंग, संशोधनाला चालना देण्यासाठी, अंदाज वर्तविण्याची क्षमता वाढविण्यासाठी उपयोग. हवामानात नावीन्यपूर्ण उपाय विकसित करण्यासाठी हे महत्त्वपूर्ण ठरेल.

# शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) साठी दुसरी परीक्षा घेण्याची घोषणा

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसई वर्षातून दोनदा सीटीईटी परीक्षा घेते. त्याच धर्तीवर राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटी घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचा प्रस्ताव पाठवण्यात आला असून, जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात किंवा जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात दुसरी टीईटी परीक्षा घेण्यात येणार असल्याची माहिती राज्य परीक्षा परीषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी दिली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने शिक्षकांना टीईटी परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे, तर शिक्षण विभागाकडून सध्या सेवेत असलेल्या शिक्षकांना मुख्याध्यापक किंवा अन्य पदोन्नती हवी असेल तर टीईटी उत्तीर्ण शिक्षकांनाच पदोन्नती द्यावी, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता सेवेत असलेल्या शिक्षकांना किंवा शिक्षक होण्याची इच्छा असलेल्या उमेदवारांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्याशिवाय पर्यायच नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे परीक्षा परिषददेखील आता दुसरी टीईटी परीक्षा घेण्याची तयारी करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.



दुसऱ्या टीईटीच्या आयोजनासंदर्भात माहिती देताना राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. बेडसे म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, शिक्षकांना पुढील दोन वर्षांत टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे शिक्षकांना जास्तीत जास्त संधी मिळावी या दृष्टिकोनातून टीईटी परीक्षेचे आता वर्षातून दोनदा आयोजन केले जाणार आहे. नुकत्याच झालेल्या परीक्षेत एक प्रश्न आम्हाला रद्द करावा लागला, हे आमच्या दृष्टीने योग्य नाही. त्यामुळे यापुढील काळात आयोजित करण्यात येणारी टीईटी परीक्षा अत्यंत पारदर्शकपणे पार पाडण्यात येणार आहे. त्यासाठी प्रश्नपत्रिकांची निर्मिती करत असताना तज्ज्ञांबरोबर चर्चा करून बारकाईने नियोजन करण्यात येणार असल्याचे डॉ. बेडसे यांनी स्पष्ट केले आहे.

गुणांमध्ये शिथिलता नाहीच!

टीईटी परीक्षेमध्ये पात्र व्हायचे असेल, तर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना ६० टक्के म्हणजेच ९० गुण, तर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना ५५ टक्के म्हणजे ८३ गुण मिळवणे गरजेचे आहे. सध्या नोकरीत असलेल्या शिक्षकांना अध्यापनाचे कार्य, कौटुंबिक समस्या, आरोग्याचे कारण आदींचा विचार करता किमान सेवेतील शिक्षकांना तरी पात्रतेमध्ये गुणांमध्ये कपात करावी, असा प्रस्ताव विविध शिक्षक संघटना तसेच काही मंत्री आणि आमदारांनी देखील दिला आहे. परंतु त्यांना कोणतीही शिथिलता देण्यासंदर्भातील निर्णय झालेला नाही. परंतु त्यांची अपेक्षा योग्य असल्याचे देखील डॉ. बेडसे यांनी स्पष्ट केले आहे.

कोल्हापूर प्रकरणातील टीईटी उमेदवारांचा निकाल राखीव

टीईटी परीक्षेदरम्यान कोल्हापूरमध्ये पेपर फुटल्याच्या बातम्या माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाल्या. यासंदर्भात पोलिसांकडून राज्य परीक्षा परिषदेत चौकशीही करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात पेपर फुटलाच नसल्याचे डॉ. बेडसे यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर अत्यंत गोपनीय पद्धतीने संबंधित परीक्षा पार पाडण्यात येते. त्यामुळे कमीत कमी हस्तक्षेप असल्यामुळे पेपर फुटण्याचा प्रश्न उद्भवत नाही. कोल्हापूर प्रकरणातील उमेदवारांचा निकाल राखीव ठेवण्यात आला असून, त्यांची सुनावणी घेण्यात येत असून, त्यानंतर संबंधित उमेदवारांचा निकाल जाहीर करण्यात येणार असल्याचे देखील डॉ. बेडसे यांनी स्पष्ट केले आहे.